
# चाणक्य

## शिकवण आणि हितोपदेश

**CHANAKYA:** HIS TEACHINGS AND ADVICE

NOW IN MARATHI



अश्वनी शर्मा

JAICO

# चाणक्याची
## शिकवण आणि हितोपदेश

# चाणक्य
# शिकवण आणि हितोपदेश

## CHANAKYA: HIS TEACHINGS AND ADVICE

NOW IN
MARATHI

अश्वनी शर्मा

जयको पब्लिशिंग हाऊस
अहमदाबाद बेंगलोर भोपाल भुबनेस्वर चेन्नई
दिल्ली हैद्राबाद कोलकाता लखनौ मुंबई

प्रकाशक
जयको पब्लिशिंग हाऊस
ए-2, जश चेंबर, 7-ए सर फिरोजशहा महेता रोड
फोर्ट, मुंबई - 400 001
jaicopub@jaicobooks.com
www.jaicobooks.com

© पंडित अश्वनी शर्मा

CHANAKYA: HIS TEACHINGS AND ADVICE
चाणक्यः शिकवण आणि हितोपदेश
ISBN 978-81-8495-370-1

अनुवाद : डॉ. अरुण मांडे

प्रथम जयको आवृत्ती: 2012
तीसरी जयको आवृत्ती: 2016

प्रकाशकांच्या पूर्व परवानगीशिवाय ह्या पुस्तकाचा कोणताही भाग, कुठल्याही प्रकारे वापरता येणार नाही, रेकॉर्डिंग किंवा कॉम्प्युटरच्या किंवा अन्य कुठल्याही माध्यमाद्वारे संग्रहित करता येणार नाही.

# अनुक्रमणिका


१. स्त्रीविषयी
२. मित्राविषयी
३. कुटुंबाविषयी
४. धर्माविषयी
५. दैनंदिन व्यवहाराविषयी निरीक्षणे
६. सूक्ते
७. सुभाषिते

१

# स्त्रीविषयी

त्र्यैलोक्याचा जो स्वामी विष्णु त्याने कृष्ण अवतारात करांगुलीवर गोवर्धन पर्वत उचलून धरला आणि इंद्राच्या आदेशावरुन वरुणाने पाडलेल्या मुसळधार वर्षापासून प्रजेचे रक्षण केले होते. असा गोवर्धन गिरीधारीसुध्दा स्त्रीच्या मोहातून सुटू शकला नाही. मग अशा स्त्रीपुढे सामान्य माणसाची काय कथा! स्त्रिया जादूगार असतात. त्या भुरळ पाडतात आणि तिचे दर्शन मनाला संतुष्ट करणारे असते. स्त्री ही परमेश्वरापेक्षाही अधिक शक्तिमान आहे.

माणसाने या संसाररुपी बंधनातून मुक्त होण्यासाठी परमेश्वराचे नामस्मरण केले पाहिजे. स्वर्गसुख मिळावे म्हणून धर्मानं सांगितलेल्या आचरणांचे पालन केले पाहिजे. हे जमत नसेल तर निदान स्त्रीच्या मोहजालापासून तरी दूर रहायला हवे. जो असे वागत नाही त्याचे वीर्य शक्ती आणि तारुण्य वाया जाते.

संकट काळी उपयोगी पडावे म्हणून काही पैसा शिल्लक टाकला पाहिजे. माणसापाशी पैसा असेल तर स्त्रीया त्याच्याकडे आकर्षित होतात. परंतु पैसा आणि स्त्री या दोन्ही गोष्टी चंचल आहेत हे माणसाने लक्षात ठेवायला हवे. या दोन्ही गोष्टी पुरुषाला सोडून केव्हा निघून जातील हे सांगता येत नाही.

विवाहाच्या बाबतीत पुरुषाने अतिशय काळजीपूर्वक निर्णय घ्यायला हवा. घाईघाईने निर्णय घेतला तर आयुष्याचे नुकसान होऊ शकते. चांगल्या कुळातील कन्या अत्यंत कुरुप असली तरी तिच्याशी विवाह करावा. हलक्या कुळातील कन्या कितीही सुंदर असली तरी तिच्याशी विवाह कधीही करु नये. आपल्या कुळाला शोभेल अशाच कुळातील कन्येशी विवाह करावा.

पुरुषापेक्षा स्त्रीया अतिशय नाजुक असतात. तरीसुध्दा त्या पुरुषापेक्षा चौपट निर्लज्ज असतात. पुरुषापेक्षा सहापट धीट असतात. मात्र तिची वासना पुरुषापेक्षा आठपट जास्त असते.

राजाच्या, गुरुच्या आणि मित्राच्या पत्नीचा तसेच सासूचा पुरुषाने नेहमीच आदर करायला हवा. त्यांच्याशी शरीरसंबंध ठेवणारा माणूस अत्यंत पापी होय. प्रत्येक धर्मामध्ये स्त्रीला नेहमीच आदराने वागवायला सांगितले आहे. कारण त्या नेहमीच आदरणीय असतात.

प्रेमाचे बंधन हे अतिशय बळकट असते. कमळात अडकलेला भुंगा जसा कमळपुष्प मिटल्यावर त्यातून बाहेर येऊ शकत नाही. तसा स्त्रीच्या प्रेमबंधनात अडकलेला पुरुष तिच्यापासून दूर होऊ शकत नाही. संसारात अनेक प्रकारची बंधने आहेत. पण प्रेमाचे बंधन हे सर्वात बळकट समजले जाते.

एखादी परस्त्री आपल्या प्रेमात पडली आहे असा समज पुरुषाने कधीही करुन घेऊ नये. पण अशी स्त्री परपुरुषाला कळसुत्री बाहुलीसारखे नाचवते.

जी स्त्री लागटपणे बोलते, दुसऱ्याला आकर्षित करेल असे हावभाव करते, नेहमी परपुरुषाचे चिंतन करते ती एकनिष्ठ कधीच असू शकत नाही. अशी स्त्री नेहमीच व्यभिचारी असते.

जी स्त्री आपल्या पतीची संमती नसतानाही उपवास व व्रतवैकल्ये करते अशा स्त्रीच्या पतीचे आयुष्य कमी होते. आणि तीही शेवटी वाईट गतीला जाते.

एखाद्या स्त्रीने भरपूर दानधर्म केला, तीर्थयात्रा केल्या, व्रतवैकल्ये केली तरी त्याने ती पवित्र होत नाही. पण तिने केवळ नवऱ्याच्या पायाचे तीर्थ घेतले तरी पवित्र होते.

नेपाळमध्ये एक प्रथा अशी आहे. नवऱ्याच्या पायाचा अंगठा तांब्याच्या ताम्हनात धुतात व ते पाणी तीर्थ म्हणून पत्नी घेते. असे करण्याने त्याचे आयुष्य वाढते. त्याला आजारपण येत नाही व त्याला सुख व समृध्दि प्राप्त होते.

लबाडी करणे, दुसऱ्याला त्रास देणे, मूर्खपणा, लोभ धरणे, न शोभणाऱ्या गोष्टी करणे हे स्त्रियांचे ठिकाणी आढळणारे प्रमुख दोष मानले जातात. अशा वर्तनाची स्त्री बघून संभ्रमीत होऊ नका.

या उलट जी नेहमी पवित्रपणे वागते, हुशारीने संसार करते, नवऱ्यावर मनापासून प्रेम करते, नेहमी सत्य बोलते, अशी स्त्री म्हणजेच संसाराचे खरे भूषण. अशी स्त्री मिळणारा पुरुष भाग्यवान असतो.

संस्कृतचा गाढा पंडित आणि प्रत्यक्ष देवही स्वर्गातील अप्सरांचे अधरावर ओठ

टेकायला मिळावे म्हणून धडपड करीत असतात. थोडक्यात, शहाण्यातला शहाणा पुरुषही परस्त्रीची अभिलाषा धरीतच असतात.

पुरुषाला सगळयात मोठा मोह कोणत्या गोष्टीचा पडत असेल तर तो स्त्रीचा. त्याचं मन स्त्रीभोवतीच घोटाळत असते. तिच्या आक्रमक-पणामुळे आणि विविध प्रकाराच्या नखऱ्यामुळे ती लवकरच पुरुषाला वासनेच्या जाळयात ओढून व्यभिचार करायला लावते.

स्त्री कितीही मोहक असली तरी आणि सोंदर्याचा कोरीव पुतळा असली तरी एक नाशवंत रक्तामासाचा गोळाच तर असते. तरीपण शहाणीसुरते पुरुषसुध्दा तिच्या रुपाला भाळतात व परस्त्रीच्या आहारी जाऊन नरकाचे धनी होतात. शहाण्या माणसाने परस्त्रीच्या मोहात पडू नये.

“हे वृध्द गृहस्था, तू काय शोधत आहेस? तुझे काही हरवले आहे काय?“

“मूर्ख माणसा, मी माझं तारुण्य शोधत आहे.”

प्रत्येक स्त्रीची एकच इच्छा असते. आपले मोहक तारुण्य कधीही नाश होऊ नये. आपण कधीही वृध्द होऊ नये. आपले तारुण्य व सौंदर्य नेहमीच उमलत्या फुलासारखे टवटवीत रहावे.

शरीरसुख मिळावे म्हणून पुरुष नेहमी अनेक स्त्रीयांच्या मागे का लागतो? शरीरसुख एकच असते. प्रत्येक स्त्रीत वेगळे सुख आहे ही एक चुकीची समजुत आहे.

स्त्री जेंव्हा रजस्वला असते तेंव्हा तिच्याशी पुरुषाने कधीही संभोग करु नये. रजस्वला असताना संबंध ठेवल्यास पुरुषाचे आयुष्य कमी होते.

घरातील भांडणे स्त्री समंजस नसली तरच होतात. म्हणून शहाण्या पुरुषाने तिचे कधी ऐकू नये. जगातील मोठमोठाली युध्देही स्त्रीमुळेच घडली आहेत. म्हणूनच सदगुणी स्त्री या पापापासून दूर राहते.

संसारात रमणारी सद्‌गुणी व चतुर स्त्री सकाळी पतीची मातेप्रमाणे सेवा करते. दुपारी ती त्याची बहीण असते आणि रात्री त्याला शरीरसुख देणारी मैत्रीण असते. अशी स्त्री पतीला सुख देते आणि त्याचा विश्वास संपादन करते. अशी स्त्री रुपाने सामान्य असली तरी पतीला आवडते.

२

# मित्राविषयी

तोंडावर गोड बोलणारा, व तुमच्या पाठीमागे तुमची निंदानालस्ती करणारा मित्र माणसाने कधीही जवळ करु नये. असा मित्र जवळ बाळगणे म्हणजे आपल्याच पायावर कुऱ्हाड मारुन घेण्यासारखे आहे. असा मित्र प्रत्यक्ष शत्रूपेक्षाही धोकादायक समजावा.

मित्राची खरी परीक्षा होते संकटकाळी. आपल्या सुखात तो सहभागी होतो आणि आपल्या दु:खात तो आपले दु:ख सहन करायला मदत करतो. अशा मित्राशी मैत्री ठेवणे केंव्हाही चांगले. पण अशा मित्राजवळही आपली गुपिते सांगू नयेत. कारण तो जर शत्रू झाला तर आपली गुपिते उघड करण्याचा संभव असतो.

जो बुध्दिमान आहे, आदरणीय आहे, निर्भय आहे, विनयशील आहे आणि त्याग करायला मागे पुढे पहात नाही अशा माणसाशीच मैत्री करावी. असे गुण नसतील तर तो माणूस मैत्री करण्याच्या लायक नाही असे समजावे. अशी मैत्री फार काळ टिकत नाही.

समाजात ज्याला मान प्रतिष्ठा आहे अशा माणसाशीच मैत्री करावी. आपल्या दर्जाचा मित्र नसेल तर अशी मैत्री सुरळीतपणे जास्त दिवस टिकू शकत नाही. ती कधीतरी लवकर आणि एका क्षणात तुटते.

श्रीमंत माणसाला नको एवढे मित्र असतात. असे मित्र गोड गोड बोलून, खोटी स्तुती करुन आपला फायदा करुन घेतात. त्या श्रीमंत माणसाला मात्र तो आपला गौरवच वाटतो. आपल्या भोवती जमलेले, आपण ज्यांना मित्र समजतो ते किती लबाड आहेत हे त्याला कळत नाही.

स्वार्थ असल्याशिवाय कुणी कुणाशी मैत्री करीत नाही. स्वार्थ नसेल तर कुणालाच

मैत्री करण्याची इच्छा होणार नाही. हे एक कटु सत्य आहे.

मित्राची खरी परीक्षा संकटकाळी होते. जोपर्यंत तुमच्यापाशी धन आहे तोपर्यंत माणसे तुम्हाला साथ देतात. पण खरा मित्र तुमच्या संकटकाळीसुध्दा तुम्हाला साथ करतो.

संकटकाळी जो मदतीला धावून येतो तोच खरा मित्र. असा मित्र संकटापासून तुमचं रक्षण करतो. असा मित्र सख्ख्या भावापेक्षाही जवळचा असतो.

सापाची–मुंगुसाशी, बकरीची–वाघाशी, चित्त्याची–हत्तीशी, वाघिणीची–कुत्र्याशी कधीही मैत्री होऊ शकणार नाही. तसेच दुष्ट प्रवृत्तीच्या माणसाशी कधीही मैत्री होऊ शकत नाही. अशी मैत्री वरवरची असते. अशा मित्रावर कधीही विश्वास ठेवू नये.

चांगल्या मित्रावर नेहमीच विश्वास ठेवावा. वाईट प्रवृत्तीचा मित्र शत्रुपेक्षाही धोकादायक असतो. त्याच्यावर कधीही विश्वास ठेवू नये.

आरसा जसा आपले प्रतिबिंब दाखवतो, तसेच एखाद्याच्या मित्रांवरुन एखाद्याचे चारित्र्य दिसून येते. म्हणून मित्रांची निवड काळजीपूर्वक र् कारण तुमच्या मित्रांवरुन तुमचा स्वभाव आणि सवयी कशा आहेत ते कळतं.

लबाड माणसाशी मैत्री कधी करु नये. ते अतिशय बडबडया स्वभावाचे आणि त्यांचं वागणं अतर्क्य असतं. त्यांच्या बोलण्यात समंजसपणा नसतो. शहाणा माणूस अशा मित्रांपासून नेहमीच दूर असतो.

संकटकाळी तुमच्यासाठी जो स्वत:चे रक्त, घामासारखे सहज सांडून तुमचे रक्षण करतो तोच खरा मित्र. बाकीचे मित्र ढोंगी आहेत असे समजावे.

मित्राच्या परिवारातील स्त्रीशी अनैतिक संबंध ठेवणे यासारखे दुसरे पाप नाही.

सुदामा व कृष्ण, कृष्ण व अर्जुन, राम व बिभीषण ही सर्व आदर्श मैत्रीची लक्षणे आहेत. मैत्रीचा आदर्श असावा तर असा.

मित्र हा काळजीपूर्वक र् आणि शांतपणे विचार करुन निवडावा. विचार न करता घाईघाईनं निवड केलेला मित्र केंव्हा शत्रू होईल र् सांगता ता येत नाही.

मुलगा वयात आला की बापाने त्याला मित्र मानावे.

तरुणीशी विवाह करण्यापूर्वी तिच्याशी मैत्री करावी. म्हणजे तिचा स्वभाव कळतो. जीवनात असे बरेच अनुभव घेतल्यानंतर वस्तुस्थितीची जाणीव होते.

३

# कुटुंबाविषयी

ज्या व्यक्तीला गुण व अवगुणाची पारख असते, जो चांगल्यावाईटाचा विचार करुन वागतो त्यालाच जीवनात खरे सुख मिळते. दु:ख मिळालेच तर अतिशय कमी प्रमाणात सहन करावे लागते.

ज्याची पत्नी दुष्ट आहे, भांडकुदळ आहे, मित्र लबाड आहेत, नोकर उर्मट आहेत, आणि ज्याच्या घरात सर्प हिंडत असतात अशा माणसाला सुख कधीच मिळत नाही. आणि अशा माणसाला मृत्यू कोणत्याही क्षणी येऊ शकतो.

घरातील मंडळी शत्रूपासून धोका आधीच ओळखतात आणि घराचं संरक्षण करण्यासाठी घरातील मंडळी आपले तन, मन आणि धन कुटुंबाला अर्पण करुन मदत करता.

ज्या घरातील मुलगा पित्याच्या वचनात असतो, ज्याची स्त्री पतिव्रता असते, कुटुंब प्रमुखाने कमावून आणलेल्या पैशात सुखासमाधानाने घर चालवते, ज्या कुटुंबातील माणसे एकमेकांशी सलोख्याने वागतात अशा माणसाच्या घरात स्वर्गसुख असते.

माणसाला अनेक कारणांमुळे दु:ख सहन करावे लागते. बुध्दिमत्ता नसल्यामुळे किंवा निर्णय घेता येत नसल्यामुळे किंवा चुकीचे निर्णय घेतल्यामुळे त्याला दु:ख सहन करावे लागते. पण दुसऱ्याच्या घरात आश्रित म्हणून रहावे लागण्या इतके दु:ख या सर्वांपेक्षाही मोठे असते. थोडक्यात परक्या घरात रहावे लागण्या इतके दु:ख कोणतेच नसते.

शहाण्या माणसांनी आपल्या मुलांना नेहमी सदाचाराचे शिक्षण द्यायला हवे.

बरेवाईट काम आहे ते समजावून संगायला हवे. त्यांना चांगल्या सवयी लावायला हव्यात. म्हणजे अशी मुले मोठेपणी चांगली वागून कुळाचे नाव काढतात.

पालकांनी आपल्या मुलांना उत्तमातले उत्तम शिक्षण देणे हे त्यांचे परम कर्तव्य आहे. जे आईवडिल असे शिक्षण देत नाहीत त्यांची मुले कुटुंबासाठी शत्रुच होतात. हंसाच्या समुहात जसा बगळा नकोसा वाटतो त्या प्रमाणे ही शहाणी नसलेली मुले समाजाला शोभत नाहीत.

मुलांचे नको ते हट्ट पुरवल्याने आणि त्यांचे अतिलाड केल्याने आईवडिल त्यांना शहाणे करण्याऐवजी बिघडवतात. म्हणून आईवडिलांनी योग्यवेळी मुलाला जरुर तर शिक्षा करुन त्यांना ताळयावर आणायला हवं. त्यांना शिस्त लावायला हवी. अशी मुले मोठेपणी सद्‌गुणी होतात.

लहान मुले ओल्या मातीच्या गोळयासारखे असतात. लहानवयातच त्यांना तुम्ही जसा आकार द्याल तसे ते घडतात. मुलांना जसे शिकवावे तशी ती होतात.

जंगलामध्ये असंख्य झाडे असतात. त्यातील एकाला जरी सुवासिक फुले असली तर सगळे जंगल आणि सगळा परिसर सुगंधित होऊन जातो. त्याप्रमाणे घराण्यात एक सदगुणी पुत्र असेल तर तो घराण्याचे नाव काढतो.

जंगलात एका झाडाला आग लागली तरी सारे जंगल जळून जाते. त्याप्रमाणे घराण्यात एक मुलगा जरी दुर्व्यसनी असला तरी सर्व घराण्याचे नुकसान होते.

अनेक मुले असावीत अशी अपेक्षा ठेवावी कशाला? एक शहाणा पुत्र असणे परवडते. शहाणासुर्ता व कर्तासवरता एकच मुलगा घराचा आधार असतो.

मुलगा पाच वर्षाचा होईपर्यंत त्याचे लाड करावे. दहा वर्षाचा होईपर्यंत त्याला जरुर तिथं शिक्षा करुन शिस्त लावावी. सोळा वर्षाचा झाला की मग मात्र त्याला बरोबरीच्या मित्रासारखे वागवावे.

ज्या घरात मूर्खांना मान मिळत नाही किंवा त्यांचा आदर होत नाही अशाच घराला वैभव प्राप्त होते. ज्या घरात पत्नी काटकसरीने संसार करते, पतीपत्नीमध्ये भांडणे होत नाहीत त्या घरातून लक्ष्मी कधी बाहेर जात नाही.

शंभर मूर्ख पुत्र असण्याऐवजी एक सद्‌गुणी पुत्र असलेला चांगला. रात्री आकाशात असंख्य तारे असतात. पण प्रकाश देणारा चंद्र एकच असतो.

मूर्ख पुत्र घरातून निघून गेला तर फारसे वाईट वाटून घेऊ नये. काळाच्या ओघात त्याची आठवण विसरुन जाते. पण तो घरात असता तर त्याचे अस्तित्व नकोसे वाटते.

मुलगा दुर्गुणी असेल किंवा देवाची पूजा करीत नसेल तर भाकड गायीसारखा तो

नकोसा होतो.

एकाच फांदीवर असलेले गोड बोर आणि काटे यांच्या गुणांमध्ये दोन विरुध्द टोकाचे अंतर असते. एकाच आईची दोन मुले गुणाने सारखीच असतील असे नाही. एकाच नक्षत्रावर जन्माला आलेले दोन जुळे भाऊ गुणाने सारखेच असतील असे नाही.

प्रत्येकाला पाच प्रकारचे जन्मदाते असतात. एक जन्म देणारा पिता. दुसरा मुंज लावणारा ब्राह्मण, तिसरा शिक्षण देणारा गुरु. चौथा संकटात रक्षण करणारा आणि पाचवा मालक, जो त्याच्या पोटाची व्यवस्था करतो.

कर्जबाजारी बाप, अनीतिने वागणारी आई, सुंदर देखणी पण बाहेरख्याली असलेली बायको, व भांडखोर पुत्र हे चार माणसाचे सर्वात वाईट शत्रू समजावेत.

विद्यार्थ्याने खालील आठ गोष्टींपासून नेहमी दूर रहायला हवे. त्या म्हणजे काम, क्रोध, लोभ, स्वादिष्ट व चमचमीत खाद्यपदार्थ, शृंगार, निरुद्देश भटकंती, अतिनिद्रा या गोष्टींपासून दूर राहिल्यास अभ्यासात लक्ष लागून तो लवकरच हुशार होईल.

सुखसमाधानाने भरलेले घर, बुध्दिमान पुत्र, मधुरभाषी पत्नी असेल तर ते घर धन्य होय.

जो दररोज शिवाची पूजा करतो. जिथं आल्यागेल्यांचा आदरसत्कार होतो ज्या घरात आज्ञाधारक नोकर र आहेत असे घर धन्य होय.

ज्या घरात सुलक्षणी स्त्री असते, गुणवान पुत्र असतो असे घर इंद्रलोकासारखे असते.

वर सांगितल्याप्रमाणे घरातील मंडळी वागतील अशा घराला सुख आणि समाधान मिळते.

– चाणक्य

४

# धर्माविषयी

त्र्यैलोक्याचा जो स्वामी विष्णु त्याला मी प्रथम नमन करतो. सर्वसामान्य माणसाच्या हितासाठी मला जे वाटते ते सांगतो. भगवान विष्णुने मला शक्ती द्यावी.

कोणत्याही चांगल्या सुभाषिताचे संपूर्ण, ते न जमल्यास त्यातील एका ओळीचे तरी चिंतन करावे. प्रत्येक वेळेस काही ना काहीतरी धर्म किंवा अध्ययन करावे.

परमेश्वराने माणसाला अतिशय मौल्यवान असे आयुष्य दिले आहे. बळकट शरीर ही त्याचीच देणगी आहे. मृत्यू येत नाही तोपर्यंत माणसाने आपल्यासाठी आणि मानवाच्या कल्याणासाठी काहीतरी सत्कर्म करावे. मृत्यूने एकदा का झडप घातली की आपण काहीही करु शकत नाही. आपल्या नशिबावर आपले नियंत्रण नसते.

काहीजण अग्नीला अतिशय पवित्र देवता मानतात. काहीजण परमेश्वराला एखाद्या मूर्तीत बघतात. ज्ञानी माणसाला सर्वत्रच परमेश्वर दिसत असतो. हा सर्व संसारच परमेश्वरमय आहे असे त्यांना वाटते.

माणसाचे जीवन क्षणभंगुर आहे. हा संसार, हे जगही क्षणभंगुर आहे. आपले आयुष्य काय आज आहे उद्या नाही. अशा या क्षणभंगुर जगात केवळ सत्य तेवढे शाश्वत आहे. माणसाने नेहमी सत्याने आणि धर्माने वागावे.

ज्याला बहुश्रुत व्हायचे असेल त्याने उत्तम श्रोता बनायला हवे. केवळ ऐकण्याने सत्य जाणून घेता येते. आणि स्वत:विषयीचे ज्ञान प्राप्त होऊ शकते. नुसते ऐकण्याने माणसाला अनेक शक्ती प्राप्त होतात. शिवाय सकारात्मक विचार करण्याची पात्रता येते.

सगळया गोष्टी विधिलिखितानुसारच होतात. माणसाच्या बुध्दीवर आणि मनावर

नशिबाचं नियंत्रण असतं. त्याच्या आयुष्यावर नक्षत्रांचा आणि ग्रहांचा प्रभाव असतो. आयुष्यात जे काही होते ते नशिबात असेल तरच होते.

विधिलिखितासमोर परमेश्वराचंही काही चालत नाही. जगात निसर्गाच्या नियमानुसारच सगळे होते. परमेश्वरालासुध्दा या नियमांचे पालन करावे लागते.

जगाच्या पाठीवर जे काही घडतं ते परमेश्वराच्या इच्छेनुसार घडतं. ब्रह्माची इच्छा असेल तर रंकाचा राव करेल किंवा रावाचा रंक.

या जगातील सर्व गोष्टींचा कर्ता करविता तो श्रीहरी असेल तर मग मला कोणत्याच गोष्टीची काळजी करण्याचे कारणच काय? अजाण अर्भकाला त्याची माता दूध पाजते. तिच्या स्तनात दूध निर्माण कोण करतो? हे श्रीहरी माझे तुला कोटी कोटी प्रणाम. तुझी कृपा असेल तर मला काळजी करण्याचे कारण नाही.

कलियुग दोन हजार पाचशे वर्षाचे आहे. या काळात माणसाचे सगळे सद्‌गुण हिरावून घेतले जातील.

या काळात अराजक माजेल. गंगा अपवित्र होईल. पृथ्वीवर विष्णुचा प्रभाव राहणार नाही. राक्षस पृथ्वीवर राज्य करतील. जगाचा शेवट जवळ येईल. जगाचा पूर्ण नाश झाल्याशिवाय नविन जग निर्माण होणार नाही. उत्पत्ती आणि विलय हे चक्र सतत चालूच राहणार आहे.

मन जर अनैतिक कर्माच्या विचाराने आणि पापाने भरलेले असेल तर कितीही धार्मिक यात्रा केल्यातरी त्याला पुण्य लाभत नाही. अशा पतीत माणसाला कधीच मुक्ती मिळत नाही. मद्याचे भांडे कितीही धुतले तरी ते स्वच्छ होत नाही.

जेवताना कधीही गप्पा मारु नयेत. जेवताना मौन पाळणे पवित्र समजावे. वर्षभर जेवताना जो मौन पाळतो त्याला दिर्घायुष्य आणि आत्मिक शांती लाभते.

जो दयाळू माणूस भुकेलेल्या माणसाला जेवण देतो आणि ब्राह्मणाला दान देतो त्याला परमेश्वर अनेकपटीने त्याचे फळ देतो.

जो भगवान कृष्णाच्या पदकमलाचे दर्शन घेत नाही, राधाकृष्णाच्या भजनात रमत नाही, ज्याने भगवान कृष्णाची गीता वाचली नाही, त्याचे जीवन व्यर्थ होय. अशा माणसाला आत्म्याचे ज्ञान कधीच मिळत नाही. आणि त्याचे जीवन सार्थक कधीच होत नाही.

कदंबाला शिशिरात पालवी फुटत नाही यात वसंत ऋतुचा काय दोष? घुबडाला दिवसा दिसत नाही यात सूर्याचा काय दोष? चातक पक्ष्याच्या चोचीत पाण्याचा थेंब पडत नाही यात मेघांचा काय दोष? कारण विधिलिखित कुणीच बदलू शकत नाही.

हे शरीर नाशवंत आहे. पैसा आज आहे उद्या नाही. म्हणून माणसाने सतत धर्मकार्य करीत रहावे. तीच सर्वात मोठी संपत्ती आहे. शेवटी तीच उपयोगी पडते.

माणसाच्या अंगात पुष्कळ सद्‌गुण असतात. पण तो त्याचा उपयोग चांगल्या कामासाठी करतो की नाही हा मोठाच प्रश्न आहे.

कल्पवृक्ष म्हणजे तरी काय एक लाकूडच. मेरुपर्वत अचल असला तरी तो काय एक दगडच. चिंतामणी हासुध्दा एक दगडच आणि कामधेनु म्हणजे शेवटी गायच. म्हणून हे रामा तुझी कुणाशीही तुलना होऊ शकत नाही. तुझ्यासारखा तूच.

आयुष्य, कर्म, विद्या, पैसा व मृत्यू या गोष्टी प्राणी गर्भावस्थेत असतानाच ठरलेले असते. त्यात माणसाला बदल करता येत नाही.

माणसाला परमेश्वराचे ज्ञान झाले की त्याचा अभिमान गळून जातो. व त्याची चित्तवृत्ती स्थिर होते. हीच समाधी.

गुरुच्या उपदेशाने किंवा स्मशानात प्रेत जळताना पाहून वैराग्य प्राप्त होते. हे वैराग्य ज्याला टिकवता आले त्याला संसारात नेहमीच समाधान लाभते. अशा माणसाला कैवल्यज्ञान प्राप्त होते.

डोळे, कान, नाक, जीभ आणि त्वचा ही ज्ञानेन्द्रिये आणि हात, पाय, तोंड, जननेंद्रिय आणि गुद ही कर्मेन्द्रिये आहेत. माणूस यांचा गुलाम असतो. ऐहिकसुखाच्या पलिकडे जायचे असेल तर पंचेन्द्रिये आणि कर्मेन्द्रियांवर नियंत्रण मिळवायला हवे. तरच तो या जन्म- मृत्यूच्या फेऱ्यातून बाहेर पडून त्याचा आत्मा मुक्त होतो.

जो स्वच्छता पाळत नाही, आळशी असतो त्याला लक्ष्मी सोडून देते. तो दरिद्री होतो.

५

# दैनंदिन व्यवहाराविषयी निरीक्षणे

जिथं मूर्ख माणसें राहतात, जिथं मोठया माणसांचा कुणी आदर करीत नाही, अशा गावी राहू नये. जिथे शिक्षणाची सोय नाही, औषधोपचारासाठी वैद्य नाही अशा ठिकाणी राहू नये.

ज्ञानी माणूस हलक्या कुळातला असला तरी त्याच्यापासून ज्ञान घ्यायला हरकत नाही. हलक्या कुळात सुसंस्कृत कन्या असेल तर तिच्याशी विवाह करायला हरकत नाही. विषामध्ये अमृत मिसळले असेल तर तेही घ्यावे. घाणीत पडलेले सोनेही घ्यायला हरकत नाही.

आपल्या मनातील खाजगी गोष्ट कुणालाही सांगू नये. स्वत:च्याच मनात ती ठेवावी आणि योग्य वेळ येताच ती प्रकट करावी. भूतकाळात केलेल्या चूका लक्षात घेऊन आणि त्या टाळून नेहमी पुढचे काम करावे. स्पर्धेच्या या युगात गुप्तता राखणे हा एक महत्वाचा गुण आहे.

दूरदृष्टिने विचार करणारा माणूस आपली कन्या चांगल्या कुळातल्या मुलाला देतो. तो आपल्या पुत्राला उत्तम आणि धार्मिक शिक्षण देतो. आपल्या मित्रांवरही चांगले धार्मिक संस्कार करतो. आणि आपल्या शत्रूला सतत अडचणीत गुंतवून ठेवतो. असा माणूस नेहमीच सुखी असतो.

संसारी गृहस्थ आपल्या पुत्रांना वेदशास्त्रसंपन्न आणि धार्मिक गुरुंपासून नेहमीच दूर ठेवतात. त्यांच्या सहवासाने आपली मुले संन्यास घेतील असे त्यांना वाटते. पण अशा ज्ञानी माणसांमुळेच मुलांमध्ये सदगुणांची वृध्दि होणार आहे. त्यांनी केलेली सत्कर्म जग कधीही विसरणार नाही. त्यांचे नाव पिढ्यानपिढ्या घेतले जाईल.

मी माझा वेळ कसा घालवतो आहे? माझे मित्र कोण आहेत, शत्रू कोण आहेत? मी कोणत्या देशाचा नागरिक आहे? माझ्या कर्मामुळे माझा किती फायदा आणि किती नुकसान होणार आहे? प्रत्येकाने अशा प्रश्नांवर नेहमी गंभीरपणे विचार करायला हवा. कारण या प्रश्नांच्या उत्तरामध्येच त्यांचे नशिब आणि यश लपलेले आहे.

शहाण्या माणसाने भविष्यकाळात येणाऱ्या अडचणींचा आधीच विचार करावा. आणि त्या अडचणी दूर करण्यासाठी आधीच तयार असावे. असा दूरदर्शीपणा नसलेला माणूस अडचणीत सापडतो आणि त्याची वाईट फळे त्याला भोगायला लागतात.

अडचणी किंवा संकटे क्षितिजावर असेपर्यंतच त्याची काळजी करावी. दुर्दैवाने कधी ती अचानक आली तर न भिता त्यांना सामर्थ्यानिशी धीराने तोंड द्यावे.

श्रीमंत माणसाभोवती नातेवाईकांचा गोतावळा नेहमीच असतो. गरीब माणसाकडे कुणी बघत नाही. संपत्तीवर डोळा ठेवून जवळ येणाऱ्या नातेवाईकांपासून नेहमी दूर रहावे.

सिंह जे काही करतो ते आपली शक्ती पणाला लावून, एकाग्र चित्ताने आणि निष्ठेने करतो, हे गुण सिंहापासून घ्यावे.

कोंबड्याला पहाटेच जाग येते. तो आपल्या शत्रूशी लढायला नेहमी तत्पर असतो. तो इतरांचे अन्न चोरुन नेण्यात पटाईत असतो. हे गुण कोंबड्यांपासून घ्यावे.

खायला जे मिळेल त्यात समाधान मानणे, गाढ झोप लागली असतानाही चटकन जागे होणे, स्वामीभक्ती व बहादुरी हे गुण कुत्र्यापासून घ्यावे.

कावळा योग्यवेळी गरजेच्या वस्तुंचा साठा करतो. तो कुणावरही विश्वास ठेवत नाही. तो अतिशय सावध असतो. आणि लैंगिकसुख गुप्तपणे घेतो. हे गुण कावळ्यापासून शिकावे.

शरीर खूप थकलेले असतानाही पडेल ते काम करणे, थंडी उन वाऱ्याची पर्वा न करणे, कुठल्याही परिस्थितीत निमूट गप्प राहणे हे गुण गाढवापासून घ्यावेत.

वरील सर्वगुण अंगीकारल्यास माणसाला कोणत्याही अडचणीवर मात करता येते.

जो प्रामाणिकपणे ज्ञानसंग्रह करतो, पैसा आणि अन्न घाईघाइने संपवत नाही आणि ज्याचा देण्याघेण्यावर ठाम विश्वास असतो असा माणूस सुखी असतो.

जो नेहमी पैशाच्या मागे लागतो त्याला जे मिळेल त्यात समाधान मानण्यासारखे सुख कधीच मिळत नाही.

वैऱ्याशी आधी गोड बोलून काम साधते का ते बघावे. तरीही शत्रू वैर सोडत नसेल

तर मात्र त्याचा नाश करायला मागे पुढे पाहू नये.

अगदी साधा सरळ स्वभाव असणे चांगले नसते. जंगलात जी झाडे सरळ साधी असतात तीच कापली जातात. वेड्यावाकडया झाडांना कुणी हात लावत नाही. म्हणून अती नम्र स्वभावही चांगला नाही.

पक्षी अन्न–पाण्याच्या शोधात सतत स्थलांतर करीत असतात. हंस पक्षी पाणी असेल तिथेच राहतो. फळे असणाऱ्या झाडावरच पक्षी गर्दी करतात. पण माणसाने असे करु नये. असे केल्याने माणसाच्या आयुष्यात गोंधळ निर्माण होईल.

यवन हा पापाचा आणि दुर्गुणुचा पुतळा असतो. पण जो धूर्त आहे आणि पूर्वग्रहदूषित नाही, त्यालाच हे लागू पडते.

जेवण झाल्यावर काहीवेळाने पाणी प्यावे. त्याने अन्न पचायला मदत होते. याउलट जेवण झाल्यावर लगेच पाणी पिल्याने ते विषासमान होते. ते आरोग्याला घातक असते.

माणसाने काही गोष्टी नेहमी लक्षात ठेवल्या पाहिजेत.

- सातू हा पदार्थ शरीराला ताकद देतो.
- चांगले रुचकर जेवण हे सर्वात उत्तम सुख.
- सर्व शरीरात मस्तक श्रेष्ठ आणि सर्व इंद्रियात डोळा श्रेष्ठ.

आपल्या हाताने केलेले काम नेहमी उत्तमच असते. आपल्या हातंनी तयार केलेली मण्यांची माळ, आपल्या हाताने उगाळलेले गंध, आणि आपण स्वत: म्हंटलेली स्त्रोत्रे सर्वात चांगली असतात. ती मनाला सुख आणि समाधान देतात. दुसऱ्यावर अवलंबुन राहिल्याने माणसाचे नुकसान होते. तो आपल्याच नजरेतून उतरतो. म्हणून नेहमी स्वावलंबी असावे.

माती, उस, तीळ, चंदन आणि सोने जितके घासावे तितके शुध्द होतात आणि सुंदर दिसतात. कच्च्या भाज्या शिजवताना त्यांची चव वाढविण्यासाठी त्यात मसाले टाकण्यासारखे हे आहे.

माणसाने आपले प्रत्येक कर्म विचारपूर्वक करावे. प्रत्येक पाऊल मागेपुढे पाहून टाकावे. समाजामध्ये सभ्यपणे रहावे. नीतिनुसार बोलावे. स्वच्छ पाणी प्यावे.

मौजमजा आराम करणाऱ्याला विद्या आणि ज्ञान कधीच प्राप्त होणार नाही. ज्याला आत्म्याचे ज्ञान मिळवायचे असेल त्याने शरीरसुखाचा व इंद्रियसुखाचा त्याग करायला हवा. संसार आणि वैराग्य यांचे मिलन म्हणजे क्षितिजापाशी जमीन आणि

आकाश यांच्या मिलनासारखे आहे.

सतत कष्ट आणि तप केल्यानेच विद्या मिळते,

अन्नापेक्षा कणीक दसपट शक्ती देते. कणकेपेक्षा दूध दसपट शक्ती देते. दुधाच्या दहापट मांस आणि मांसाच्या दहापट तूप शक्ती देते. म्हणून ताकद मिळवण्यास तूपच सर्वश्रेष्ठ आहे.

दूध शक्ती देते. तूपाने वीर्य घट्ट होते. आणि मंसाने स्नायु बळकट होतात.

मद्यपान हे शरीराला आणि मनाला हानीकारक आहे.

घरातील लोकांशी उदारपणे वागणारा, इतरांशी आपलेपणाने वागणारा, दुष्टांशी कठोरपणे वागणारा, विव्दानांशी नम्रतेने वागणारा माणूस शहाणा असतो.

जो शत्रूशी शौर्याने लढतो, वडिलधाऱ्यांसमोर नम्रतेने वागतो, परस्त्रीशी आदराने वागतो, लबाड लोकांशी धूर्तपणे वागतो असा माणूस नेहमी सुखी असतो.

जो माणूस विचार न करता पैशाची उधळपट्टी करतो, कुणाशीही भांडतो, प्रत्येक स्त्रीचा मग ती कोणत्याही वर्णाची, जातीची, कुळाची असो तिचा उपभोग घेण्याची इच्छा करतो, असा माणूस फार दिवस जगत नाही.

जो माणूस कोणतेही ज्ञान शिकण्यास तत्पर असतो, कोणाच्याही हातचे जेवण घेण्यास कचरत नाही, आणि आपल्याजवळ जे आहे ते इतरांना देण्यास सदैव तयार असतो तो शांत, स्थिरमनाचा आणि सुखी असतो.

भूतकाळ कुणालाही बदलता येत नाही. पण भविष्याची चिंता केल्याने आपला वर्तमानकाळ मात्र वाया जातो. भूतकाळ परत येत नाही. भविष्यकाळात काय आहे माहीत नाही. म्हणून नेहमी वर्तमानकाळाचा विचार करावा. जो वर्तमानकाळाच्या मार्गावरुन चालतो त्यालाच सुखाची शिखरे पादाक्रांत करता येतात.

अंधविश्वास आणि पोकळ आशावाद यामुळे दु:ख, यातना अस्वास्थ्य आणि भीति वाट्याला येते. म्हणून शहाणा माणूस अशा लोकांशी कधीच संबंध ठेवत नाही. आणि तो म्हणूनच सुखी असतो.

जो माणूस येणाऱ्या संकटातून सुटका करण्याचा मार्ग आधीच शोधतो, संकट समोर आलेच तर धैर्याने त्याला तोंड देतो तो माणूस सुखी होतो. जे व्हायचे असेल ते होईल, जे नशिबात असेल ते भोगावेच लागणार आहे, असा विचार करणाऱ्या माणसाला आपल्या बुध्दीचा आणि सामर्थ्याचा कधीच उपयोग करता येत नाही.

मनामुळेच भौतिक सुखे भोगण्याची इच्छा होते. मनामुळेच भौतिक सुखाच्या वासनेतून सुटका करुन घेऊन मुक्ती मिळवता येते. मोक्षमुक्ती आणि बंधन याला कारण

मनच. म्हणून मनावर नियंत्रण ठेवावे.

ज्याचे मन अस्थिर आणि चंचल आहे त्याला माणसात राहूनही सुख मिळत नाही आणि जंगलात एकांतात राहूनही शांती मिळत नाही. असा माणूस कुठेही असला तरी असंतुष्ट असतो.

कुदळीने खोल खणल्यावरच पाणी लागते. त्याप्रमाणे गुरुची खूप सेवा केल्यानेच विद्या मिळते.

जसे पेरावे तसे उगवते. माणसाचे जसे कर्म तसे फळ मिळते. म्हणून शहाणा माणूस नेहमी पूर्ण विचार करुनच कोणतंही काम करतात.

गुरुचा अपमान करणाऱ्या शिष्याला पुढच्या जन्मात नरकात जावे लागते. म्हणून गुरुने कितीही थोडे शिकवले असले तरी त्याचा नेहमीच आदर करावा.

आहार, निद्रा, भ्रम आणि मैथुन हे गुण पशूंमध्येही आहेत. मग पशूमध्ये आणि माणसात फरक काय आहे? माणसाला ज्ञान मिळवता येते. त्याच्यापाशी बुध्दि आहे. बुध्दीहीन आणि ज्ञानहीन माणूस हा पशूसारखाच असतो.

दुसऱ्यावर उपकार करणाऱ्या माणसाला नेहमीच सुख आणि समृध्दी मिळते. त्याच्या समस्या आपोआप दूर होतात.

कष्ट केल्याशिवाय हवी असलेली गोष्ट मिळत नाही. शिस्त आणि कष्ट केल्यानेच इच्छित फळ प्राप्त होते.

आयुष्यात माणसाने दोन गोष्टी स्विकारायला हव्यात. एक गोड बोलणे आणि दुसरी चांगल्या माणसांशी मैत्री. सज्जनांच्या संगतीत राहिल्याने वाणी गोड होते आणि त्याचे आयुष्य सुखी होते.

मित्राचा विश्वासघात, शत्रूला जाऊन मिळणे, अनैतिक मार्गाने पैसा कमावणे, या गोष्टी परिस्थिती कितीही वाईट असली तरी करु नये. लबाडीने मिळवलेला पैसा लवकर नष्ट होतो.

अनैतिक मार्गाने मिळवलेला पैसा फार तर दहा वर्ष टिकतो. त्यानंतर तो नष्ट होतोच शिवाय त्या माणसालाही नष्ट करतो. म्हणून लबाडीने कधीही पैसा कमावू नये.

गुरुने शिष्याला कितीही अल्प ज्ञान दिले तरी शिष्याने त्याचा आदर करावा. शिकवणे आणि ज्ञान देणे याच्या इतके श्रेष्ठ दान कोणतेच नाही. अशा दानाची परतफेड कधीच करता येत नाही.

कोणतेही बी पेरताना त्याचे फळ कोणते येणार आहे त्याचा आधीच विचार करावा. कर्म करण्यापूर्वीच त्याच्या फळाचा विचार करावा. फळ वाईट मिळणार असेल

तर असे कर्म कधी करु नये.

कोणतेही कर्म करण्याआधी तीन प्रश्न स्वत:ला विचारावे.

- हे काम मी का करीत आहे?
- त्याचे परीणाम कोणते होणार आहेत?
- हे कर्म केल्याने यश मिळणार आहे की अपयश?

या तीन प्रश्नांची उत्तरे समाधानकारक मिळाली तरच ते कर्म करावे.

माणसाने नेहमी स्वत:वर विश्वास ठेवावा. दुसऱ्यावर विश्वास ठेवणे निष्फळ आणि धोकादायक असते. दुसऱ्यावर विश्वास ठेवला तर तो तुमचा विश्वासघात करुन केव्हा खड्ड्यात घालील ते सांगता येत नाही. म्हणून नेहमी स्वत:वर विश्वास ठेवावा.

६

# सूक्ते

मूर्खाला कधीही उपदेश करु नये. भांडखोर स्त्रीच्या कधीही नादी लागू नये आणि संकटात सापडलेल्यांशी कधीही संबंध ठेवू नये.

हातचे सोडून पळत्याच्या पाठीमागे कधीही लागू नये. त्याने दुहेरी नुकसान होते. हातचे तर जातेच पण पळतेही निसटते.

नदी, स्त्री, राजघराण्यातली माणसे, शस्त्र हातात घेतलेला माणूस व शिंग आणि धारदार नखे असणारा प्राणी यांच्यावर कधीही विश्वास ठेवू नये.

आज्ञाधारक पुत्र तोच खरा पुत्र. मुलांचे पालनपोषण करतो तोच खरा पिता. जो विश्वासू असतो तोच खरा मित्र. पतीला जी पूर्ण सुख देते तीच खरी पत्नी.

चंदनाची झाडे आणि अस्सल रत्ने सर्वत्र दिसत नाहीत. ती दुर्मिळ असतात आणि क्वचितच सापडतात. साधूसंतही असेच दुर्मिळ आहेत. चकाकते ते सर्वच सोने नसते ही म्हण माहीत असेल. या जगात नकली वस्तू खूप आहेत. अस्सल कोणते आणि नकली कोणते याची पारख करता यायला हवी.

राजा प्रजेची काळजी घेतो. व्यापाऱ्याच्या मनात नेहमी व्यवसायाचे विचारच असतात. विद्यार्थ्याला नेहमी ज्ञान मिळवण्याची उत्सुकता असते. आणि देखण्या स्त्रीमुळे घराला शोभा येते.

जंगलात वणवा पसरला की हरीण जंगल सोडून देते. ब्राह्मणाला दक्षिणा मिळाली की तो लगेच निघून जातो. शिष्याला ज्ञान मिळाले की तो गुरुला सोडून देतो.

जो कर्जात बुडालेला आहे, आपल्याच लोकांकडून जो अपमानित झाला आहे, जो

पत्नीपासून विभक्त आहे आणि दुष्टाशी संगत असलेला व्यक्ती आगीशिवाय भाजून निघतो.

नदीकिनारी असलेले झाड, पतीला सोडून दुसऱ्याबरोबर पळून गेलेली स्त्री, न्यायी मंत्री नसलेला राजा यांचा शेवट अतिशय वाईट असतो.

विद्या हेच ब्राह्मणाचे धन, सैन्य हेच राजाचे धन, व्यापार हेच वैशाचे धन. आणि सेवा हेच शुद्राचे धन.

वाळलेल्या झाडावर पक्षी घरटं करीत नाही. गरीबाला वेश्या जवळ येऊ देत नाही आणि दुर्बळ राजाला त्याची प्रजा सोडून जाते, हे कायम सत्य आहे.

कुणीही कायमचा सुखी नसतो. दोष नाही असे कोणते घर आहे?

रोगामुळे शरीर क्षीण होत गेले की दु:ख सावली सारखं पाठ सोडत नाही.

माणूस कोणत्या कुळातला आहे हे त्याच्या वागणुकीवरुन कळते. भाषेवरुन तो कोणत्या देशाचा आहे ते कळते. जो दुसऱ्याचा आदर करतो तो नेहमी प्रेमळ स्वभावाचा आहे हे ओळखता येते. शरीरावरुन त्याचे खाणेपिणे कळते.

साधू संत नेहमीच विश्वासू असतात. म्हणून राजा प्रवासात नेहमी त्यांना सोबत नेतो.

समुद्र नेहमी कितीही शांत असला तरी वादळामुळे त्यावर लाटा उसळतात. आणि पूर येतो. पण साधूपुरुष कितीही अपमानीत झाला तरी तो आपली मर्यादा सोडीत नाही.

कोकिळेचा गोड गळा हेच तिचे सौंदर्य. पतिव्रता धर्म हेच स्त्रीचे सौंदर्य. विद्या हेच पुरुषाचे सौदर्य. तर क्षमा हे तपस्वी माणसाचे भूषण.

कुळाच्या रक्षणासाठी वेळ आली तर स्वत:चे बलिदान करावे. गावाच्या रक्षणासाठी कुळाचा नाश झाला तरी चालेल. देशाच्या रक्षणासाठी गाव बळी दिला तरी चालेल. आणि वेळ आली तर आत्मसन्मानासाठी सर्वस्वाचा त्याग करावा.

कोणतीही गोष्ट अति असेल तर त्याची हानीच होते. रामाची आदर्श पत्नी रावणाने पळवली. अति गर्व केल्याने रावणाने आपले स्वत:चे कुळही नष्ट केले. अति दानधर्म केल्याने वामनाने बळीला पाताळात लोटले.

एखाद्याची महत्वाकांक्षा जागृत झाली की मग त्याला काहीही अवघड नाही. व्यापार करणाऱ्याला कोणताही देश दूर नसतो. विव्दानाला कोणताही देश परका नसतो. कुठेही गेला तरी तो घरी असल्यासारखाच असतो.

सज्जनाची संगत धरल्याने माणसाला सुख लाभते.

कटकट करणारी पत्नी, मूर्ख पुत्र , हलक्या माणसाची चाकरी, भांडखोर शेजार ही सर्व माणसाच्या शरीराला अग्नीशिवाय जाळतात.

या संसारात म्हातारपणी माणसाला सुख देणाऱ्या तीनच गोष्टी आहेत. आपली मुले, साथ देणारी पत्नी आणि सज्जनांची संगत.

तीन गोष्टी एकदाच होतात. राजा एकदाच हुकूम करतो. शहाणा माणूस एकदाच बोलतो. कन्यादान एकदाच करता येते.

तपसाधना एकट्यानेच करावी. विद्या दोघांनी मिळून शिकावी. तिघांनी मिळून गाणे शिकावे. प्रवास चौघांनी मिळून करावा. शेती पाचजणांनी मिळून करावी. पण युध्द मात्र अनेकजणांनी मिळून करावं.

पुत्राशिवाय घराला शोभा नाही. भाऊबंद नसतील तर माणूस दिशाहीन होतो. मूर्ख माणसाला नेहमीच दु:ख सहन करावे लागते.

भांडखोर पत्नी, भाउबंदकी करणारे भाऊ. हुशार नसलेला मालक आणि ज्या धर्मात दया नसेल अशा गोष्टी सोडून द्याव्यात.

न पचलेले अन्न विषासारखे असते. दारिद्रय हे माणसाला विषासमानच असते. म्हाताऱ्याला तरुण पत्नी विषासमानच असते.

कोणतेही ज्ञान उपयोगात आणले नाही तर ते वायाच जाते.

ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य यांना अग्नी हा गुरुसारखा असतो. संसारात अतिथी हा गुरुसारखा असतो. पती हा स्त्रीचा गुरु असतो. अशा व्यक्तिंना नेहमी आदराने वागवावे.

वैराग्य आलेल्या माणसाचा संसार यशस्वी होत नाही. ज्याला वासना नसते त्याला शृंगारात रस नसतो. विव्दान माणूस नेहमीच गुळमिळीत बोलतो. साधा सरळ माणूस इतरांशी वागताना कपट कधीच करु शकत नाही.

हेवा करणे ही माणसाची उपजत प्रवृत्ती आहे. मूर्ख माणूस विव्दानाचा हेवा करतो. गरीब श्रीमंताचा हेवा करतो. वेश्या संसारी स्त्रीचा हेवा करते आणि विधवेला सुवासिनीचा हेवा वाटतो.

आळशी माणसाची विद्या नष्ट होते. पण समतोल आहार आणि मनावर संयम ठेवल्याने विद्येचे रक्षण करता येते. दयाळू प्रजा राजाचे रक्षण करते. सुसंस्कृत व सुशील स्त्रीमुळे घराचे रक्षण होते. सेनापती दुर्बळ असेल तर सैन्य हरते.

अज्ञानी माणूस पंडिताशी काही कारण नसताना भांडू लागला तर त्याला

आपल्या कर्माचे फळ भोगावेच लागते.

दानधर्म केल्याने दारिद्रय नाहीसे होते. ज्ञानी माणसाचा उपदेश अज्ञानी माणसाच्या आयुष्यातला अंधार दूर करतो. सद्हेतू मुळे दुसऱ्याच्या मनातली भीती नाहीशी होते.

कामवासनेमुळे माणूस मनाने दरिद्री होतो. शरीराने अशक्त आणि रोगी होतो. अज्ञानासारखा शत्रू नाही. संतापासारखी आग नाही. ती हृदय जाळून टाकते. ज्ञानासारखे सुख नाही.

प्रत्येकाला आपल्या कर्माचे फळ भोगावेच लागते. आपले कर्म सावलीसारखे आपल्या मागे येते. आपल्या कर्मामुळे आपणच नरक निर्माण करतो. तप केल्यानंतरच यातून मुक्ती मिळते.

ज्ञानी माणसाला स्वर्गसुखाची काही किंमत नसते. ऐहिक जग निरर्थक वाटते. मनावर आणि इंद्रियावर संयम असलेल्या माणसावर सुंदर स्त्री मोहिनी घालू शकत नाही.

मृत्यूनंतर त्याचे कर्मच त्याला मार्ग दाखवते. चांगले कर्म हे रोग्याला औषध मिळाल्यासारखे असते. आणि अज्ञानी माणसाला ज्ञान मिळाल्यासारखे असते.

पावसाच्या पाण्याने समुद्राला पूर येणार नाही. पोट भरलेल्या माणसाला सुग्रास अन्नही नकोसे होते. श्रीमंत माणसाने दान केले तर त्याचे नुकसान होत नाही.

ढगातून पडणाऱ्या पाण्यासारखे दुसरे स्वच्छ पाणी नाही. कोणतेही काम शांतपणे आणि धैर्याने केले तरच ते पूर्ण होते. तेजस्वी डोळयासारखे तेज जगात दुसरे कोणतेही नाही.

गरीबी सहन करणाऱ्या माणसाला श्रीमंत व्हावेसे वाटते. पशूला बंधनातून मुक्त व्हावेसे वाटते. मर्त्य माणसाला स्वर्गाची आशा असते. निरिच्छ आणि समाधानाचा मार्ग हा दूरचा आणि खडतर असतो.

माणसात न्हावी, पक्ष्यात कावळा, पशूत कुत्रा आणि कुलटा स्त्री यांचे मन कुणालाही जाणता येत नाही. ते अतिशय हुषार आणि कपटी असतात.

जे वरुन साधू आणि आतून संधीसाधू असतात ते तिरस्करणीय असतात. पण दुसऱ्याची निंदानालस्ती करणारे, अफवा पसरवणारे हे पृथ्वीवरचे सगळयात वाईट माणसं आहेत.

भांडे राखेने घासल्याने, तांब्याचे भांडे चिंचेने घासल्याने, नदीचे पाणी पाऊस पडल्याने आणि स्त्री रजस्वला होण्याने शुध्द होते.

भटकणारा राजा, ब्राह्मण आणि योगी हे सर्व वंदनीय आहेत. पण भटकणारी स्त्री

मात्रं वंदनीय नाही. तिला कुणीही मान देत नाही. ती खाली मान घालून चालत असली तरी तिच्याकडे सगळे संशयानेच बघतात.

७

# सुभाषिते

## डोळे असून आंधळे

माणसाला अंधत्व अनेक प्रकारचे असते. काहीजण जन्मत:च आंधळे असतात. तर काहींना डोळे असतात पण काही कारणाने त्यांच्या डोळयांवर आच्छादने आल्याने डोळे असुनही काही गोष्टी दिसत नाही.

श्रावणात माणसाला कमी दिसतं. काहीजण कामवासनेमुळे आंधळे झालेले असतात. मदांधाला काहीच दिसत नाही. लोभी माणसाला वस्तूत कोणताच दोष दिसत नाही. म्हणून अशा माणसांना डोळे असून आंधळे असे म्हंटले जाते.

## वशीकरण

आपला स्वार्थ साधून घ्यायचा असेल तर समोरच्या माणसाच्या कलाने घ्यावे. त्याची आवडनिवड लक्षात घ्यावी. त्याच्या उणीवा लक्षात घ्याव्या. आणि मग त्याला वश करावं. लोभी माणसाला पैसा देऊन, गर्विष्ठ माणसाला हात जोडून खोटा मान देऊन, मूर्ख माणसाला त्याच्या मर्जीप्रमाणे वागू देऊन, विद्वानाशी खरे बोलून आपले कर्म साधून घ्यावे.

## अधम माणसाचा सहवास

भ्रष्टाचारी आणि देशद्रोही राजापासून काय लाभ होणार आहे? ज्याच्या मनात तुमच्याविषयी वाईट हेतू आहे अशा मित्राच्या संगतीपासून काय लाभ मिळणार आहे? चंचलस्वभावाचा आणि अप्रामाणिक शिष्य असेल तर तो गुरुची प्रतिष्ठा धूळीला

मिळवतो. जो सत्याच्या मार्गापासून ढळतो त्याला उद्युक्त कधीच करता येत नाही. गुरुपासून त्याला काहीही शिकायला मिळत नाही. भांडखोर आणि व्यभिचारी स्त्रीशी केलेला संसार कधीही सुखी होऊ शकत नाही. त्याला शांती मिळत तर नाहीच शिवाय त्याचे जीवन नरकासमान होते.

अशा निर्बुध्द माणसांपासून नेहमी दूर रहावे. चंचल स्वभावाच्या शिष्यापासून गुरुने, वाईट आणि स्वार्थी मित्रापासून प्रत्येकाने, भ्रष्टाचारी राजापासून प्रजेने आणि व्यभिचारी पत्नीपासून पतीने नेहमी दूर रहावे. अशा माणसांपासून कोणताही लाभ होत नाही.

यांच्यात कधी पडू नये

ब्राह्मणाचा राग कधी ओढवून घेऊ नये. तो केव्हा शाप देईल सांगता येत नाही. तसेच नवराबायकोच्या आणि मालक-नोकराच्या भांडणात कधी पडू नये. आपणच संकटात सापडतो. अग्नी, नांगर आणि बैल यांच्यात आपण कधी पडू नये. अग्नी भाजून काढतो. नांगर आणि बैलामुळे जखमी होण्याची शक्यता असते.

यांचा आदर करावा

विस्तव, ब्राह्मण, गुरु, कुमारिका, वृध्द व बालक हे सर्व आदरणीय आहेत. त्यांना कधी पाय लावू नये. विस्तवावर पाय पडल्यास तो भाजेल. ब्राह्मण व गुरु रागवेल. वृध्द व बालक हे ईश्वराचे अंश आहेत. आपल्यापेक्षा वयाने आणि ज्ञानाने वडिलधाऱ्या माणसांचा नेहमी आदर करावा.

यांच्यापासून दूर रहा

हत्तीपासून हजार हात दूर रहावे. घोड्यापासून शंभर हात दूर रहावे. शिंग असणाऱ्या पशूपासून दहा हात दूर रहावे. त्यामुळे संकट टाळता येते. पण दुष्ट माणूस भेटला तर तिथून पळच काढावा. वर सांगितलेल्या प्राण्यांपासून दूर राहून धोका टाळता येतो. पण दुष्ट माणूस कितीही दूर असला तरी आपल्याला त्रास देऊ शकतो.

यांना असे ताब्यात ठेवावे

हत्तीला अंकुशाने ताब्यात ठेवता येते. घोड्याला हातातल्या चाबकाने ताब्यात ठेवता येते. शिंगवाल्या जनावरांना काठीने ताब्यात ठेवता येते. पण दुष्ट माणसाला हातात तलवार घेऊनच ताब्यात ठेवता येते. थोडक्यात स्वभाव बघून त्यानुसार वागावे.

स्वभावाला औषध नाही

जो तो आपल्या सवयीप्रमाणे संतुष्ट होत असतो. ब्राह्मण सुग्रास जेवणाने संतुष्ट होतो. मेघगर्जना ऐकून शेतकऱ्याला आनंद होतो. पण दुष्ट माणूस मात्र दुसरा संकटात सापडला म्हणजे खूष होतो. प्रत्येकजण आपापल्या स्वभावाप्रमाणे वागतो. तो कोण बदलणार? स्वभावाला औषध नाही.

कुणीही दुर्बळ नसतो

परमेश्वराने प्रत्येकाला सामर्थ्य दिले आहे. वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणाचे सामर्थ्य त्याच्या ज्ञानात असते. स्त्रीचे सामर्थ्य तिच्या सौंदर्यात आणि तारुण्यात असते. प्रत्येकाला काही ना काहीतरी सामर्थ्य परमेश्वराने दिले आहे. म्हणून कुणालाही दुर्बळ समजू नये संधी येताच तो आपले सामर्थ्य प्रकट करतो. दुर्बळ र् शत्रूलाही कमी लेखू नये.

संगतीचा परीणाम

तापलेल्या तव्यावर पाण्याचा थेंब पडताच चुर्र असा आवाज करुन त्याची वाफ होते. कमळावर पडलेल्या पावसाच्या पाण्याचा थेंब सूर्याच्या प्रकाशात मोत्यासारखा चमकतो आणि त्याची वाफ होते. तोच पावसाचा थेंब स्वाती नक्षत्रात शिंपल्यात पडला तर मोती होतो. थोडक्यात संगतीचा परीणाम तुमच्या स्वभावावर होतो. म्हणून नेहमी विचारपूर्वक संगत धरावी.

संपत्तीचा प्रभाव

पैसा असला की मान-सन्मान मिळतो. पैसा असला की मित्र आणि नातेवाईक गोळा होतात. नातेवाईकांना तो हवाहवासा आणि जवळचा व आदरणीय वाटतो. पैसा असलेल्या माणसाला माणूस म्हणून समाजात मान मिळतो. आणि माणसाने आदर्शपणे जगावे तसे तो जगतो. शहाणा आणि विद्वान माणूसही त्याची स्तुती करतो. त्याच्या कृपादृष्टिची आशा करतो. श्रीमंत माणसात दोष असले तरी लोक त्याकडे दुर्लक्ष करतात. गरीब माणसाला समाजात हीनतेची वागणूक मिळते. त्याला कुणी मान देत नाही.

देवतासमान माणसे

जो नेहमी दानधर्म करतो, गोड बोलतो, ब्राह्मणांचा आदर करतो आणि परमेश्वराची आराधना करतो तो माणूस देवतासमानच असतो. त्याचे जीवन धन्य होय. असे गुण प्रत्येकाने जोपासायला हवे.

निंदनीय कोण?

जो आपल्या मित्रांशी आणि भावांशी भांडतो, ज्याला आपल्या क्रोधावर नियंत्रण ठेवता येत नाही, आणि ज्याचं बोलणं कठोर असतं अशी माणसं निंदनीय असतात आणि

ती नरकात जातात. अशी माणसे या भूतलावरची राक्षसच होत.

स्वभावाची पारख

सिंहाच्या गुहेत हत्तीचे गंडस्थळ आणि मांसाचे तुकडे मिळतात. लांडग्याच्या गुहेत वासराची शेपटी आणि गाढवाचे कातडे सापडते.

तसेच माणसाच्या घरात पसरलेल्या वस्तूंचं निरीक्षण करुन त्याचा स्वभाव कसा आहे याची पारख करता येते. घर म्हणजे माणसाच्या स्वभावाचा आरसाच असतो.

महत्त्व कोणत्या गोष्टीला ?

स्वार्थी आणि हिनकुळातला माणूस सतत पैशाची हाव करतो. अशा माणसाला पैशाशिवाय इतर कोणत्याही गोष्टीला जास्त महत्त्व नसतं.

समान्य माणसाला पैसाही हवा असतो आणि समाजात मान्यताही हवी असते. याच गोष्टीला ते महत्त्व देतात. शहाण्या लोकांना मानमान्यता मिळावी एवढीच इच्छा असते. त्यांना श्रीमंतीचं महत्त्व नसतं.

सत्पात्री कोण?

संपत्ती गुणी माणसांना द्यावी. गुणी माणसेच त्याला पात्र असतात. समुद्रातील खारट पाणी ढग पिऊन घेतात आणि अमृतासारखे गोड पाणी पावसाच्या रुपाने पृथ्वीवर वर्षाव करतात. आणि सर्वांना नवचैतन्य देतात.

म्हणून दान करताना तो त्या दानाला पात्र आहे की नाही हे आधी बघावे.

पालक

कृतीविना ज्ञान काही कामाचे नाही. त्यामुळे ते नष्ट होते. ज्ञानी माणूस आळशी असेल तर त्याचा ज्ञानवृक्ष वाळून जातो. सेनापती नसेल तर सेनेमध्ये गोंधळ उडतो. पतीच्या निधनानंतर पत्नीला आयुष्य निरस वाटू लागते. तिचे आयुष्य साचलेल्या डबक्यासारखे होते. म्हणून पालक नसेल तर सगळे जीवनच निरर्थक होते.

सर्वात वाईट दु:ख

प्रत्येकाच्या आयुष्यात वाईट प्रसंग खूप येतात. पण वृध्दापकाळात पत्नीचं निधन, बांधवांनी लाटलेली संपत्ती, आश्रितासारखे दुसऱ्याच्या घरी राहणे, आणि खाण्यापिण्याची शाश्वती नसणे याचे दु:ख सर्वात वाईट.

निर्धार

घरात अग्नीहोत्र नसेल तर वेदाभ्यास व्यर्थ आहे. ज्ञान नसेल तर यज्ञकर्माचे फळ मिळत नाही. निर्धार आणि धीर नसेल तर कोणत्याही गोष्टीत यश मिळत नाही. म्हणून कोणतेही कार्य करायचे असेल तर ते निष्ठेने व श्रध्देने करावे.

## हे गुण अंगीकारावेत

शांतीसारखे तप नाही. संतोषासारखे सुख नाही. लोभासारखा रोग नाही. दयेसारखा धर्म नाही.

म्हणून या आयुष्यात काही कमवायचे असेल तर लोभ, लाभ, हाव इत्यादी टाकून शांती संतोष आणि दया हे गुण अंगीकारावेत.

## चांगले ते घ्या

संताप, क्रोध म्हणजे प्रत्यक्ष यमच. संतापामुळे नाशच होतो. आणि नाश झाला की मृत्यूच.

तृष्णा ही वैतरणा नदीसारखी म्हणजे नरकातल्या नदीसारखी असते. ती माणसाच्या हृदयात घुसते आणि त्याला वहात नेऊन अग्नीमध्ये टाकते आणि अनंत यातना भोगायला लावते.

विद्या ही सर्व कामना पूर्ण करणारी कामधेनु आहे. समाधान हे इंद्राच्या नंदनवना सारखे आहे, जे तुम्हाला अमर्याद सुख प्राप्त करुन.

म्हणून वाईट असेल ते टाकून द्या आणि चांगले असेल ते घ्या.

## गुणांचे महत्त्व

रुपवान माणूस सदगुणी नसेल तर त्या रुपाला काही अर्थ नाही. शीलवान माणसांमुळे घराला शोभा येते. आत्मसात केलेली विद्या व्यवहारात उपयोगाला आली नाही तर तिला काही अर्थ नाही. पैसा जर तिजोरीत पडून असेल तर तिचा काही उपयोग नाही. तसेच कृपणाच्या हातात पैसा असेल तो निरर्थकच समजावा.

## गुण अवगुण

असंतुष्ट ब्राह्मण, अल्पसंतुष्ट राजा, लाजणारी वेश्या आणि निर्लज्ज पत्नी यांना कधीच सुख मिळत नाही.

हावरट ब्राह्मणाला कितीही दक्षिणा दिली तरी त्यात त्याचे समाधान नसते. अल्पसंतुष्ट राजाचे राज्य कधीच मोठे होऊ शकत नाही. राजाने नेहमी महत्वाकांक्षी

असावे. संधी मिळताच राज्याचा विस्तार करायला हवा.

वेश्येच्या अंगी धीटपणा असायला हवा. नाहीतर तिच्याकडे कुणीही गिऱ्हाइकं येणार नाहीत.

संसारी स्त्रीने लाज सोडली तर तिचा नवरा तिला विचारणार नाही, तिचा त्याग करील.

एकाचा गुण तो दुसऱ्याचा अवगुण ठरतो. गुण अवगुण हे परिस्थिती, व्यक्ती आणि त्याच्या उपजिवीकेचे साधन यावर अवलंबून असतात.

विद्येचे महत्त्व

विद्वान व्यक्तीला सर्वत्र मान मिळतो. देशात आणि परदेशातही त्याचा आदर होतो. विद्वान माणसाला विद्येच्या जोरावर जगातली कोणतीही वस्तू मिळवता येते.

अशिक्षित माणूस देखणा असला किंवा उच्च कुळातला असला तरी त्याचा आदर कुणी करीत नाही. गंध नसलेल्या फुलाप्रमाणे सर्वजण त्याच्याकडे दुर्लक्ष करतात. असा माणूस पृथ्वीला भारच समजावा.

अमोल सल्ला

जो माणूस आपली रहस्ये इतरांजवळ प्रकट करतो तो नेहमीच संकटात सापडतो. स्वत:चे कल्याण साधून घ्यायचे असेल तर आपली रहस्ये इतरांना कधीच सांगू नये. हा सल्ला जो ऐकत नाही तो सापाच्या बीळात सापडलेल्या उंदरासारखा मरतो. आणि या सल्ल्याप्रमाणे जो वागतो तो नेहमी अभेद्य आणि अजिंक्य होतो.

झोप

विद्यार्थी, नोकर, प्रवासी, दुकानदार, आणि पहारेकरी व भिकारी झोपलेला असेल तर त्याला तात्काळ उठवावे. कारण विद्यार्थी झोपला तर त्याला विद्या मिळणार नाही. नोकर झोपला तर तो मालकाची सेवा करु शकणार नाही. प्रवासी झोपला तर तो पुढला प्रवास करु शकणार नाही. भिकारी झोपला तर त्याला भीक कुणी देणार नाही. दुकानदार झोपला तर त्याच्या मालाची विक्री करु शकणार नाही. आणि पहारेकरी झोपला तर तो चोरांपासून रक्षण करु शकणार नाही.

याउलट, साप, सिंह, गांधीमाशी किंवा चिडखोर माणूस, लहान मूल, कुत्रा, मूर्ख राजा झोपला असेल तर त्याला कधी उठवू नये. साप जागा झाला तर चावू शकतो, सिंह जागा झाला तर अंगावर येऊ शकतो, गांधीमाशी जागी झाली तर चावू शकते. लहान मुलं जागे झाले तर रडू शकते. कुत्रा जागा झाला तर चावू शकतो. मूर्ख माणूस जागा झाला तर

तो शिव्या देऊ शकतो. राजा जागा झाला तर तो रागवू शकतो.

चांगुलपणाची मर्यादा

दक्षिणा मिळण्याच्या हावरटपणामुळे ब्राह्मणाने वेद म्हणून दाखवले आणि हलक्या कुळातल्या हातचे अन्न खाल्ले तर तो खरा ब्राह्मण नव्हे असे समजावे.

ही चांगुलपणाची मर्यादा समजावी. ती जर ओलांडली तर तो माणूस आपला मान सन्मान हरवून बसतो. त्याला समाजात प्रतिष्ठा रहात नाही.

दिमाख

प्रत्येकाने थोडासा तरी दिमाख दाखवायला हवा. बिनविषारी साप सुध्दा फुस्स करुन अंगावर येतो. इतरांपासून रक्षण करण्याचे तेवढेच एक साधन त्याच्याजवळ असते. लहान मुल सुध्दा रडून लक्ष वेधून घेते. ते रडले नाही तर दुर्लक्षी राहील्यामुळे मरुन जाईल.

वायफळ गप्पात वेळ वाया घालवू नका

जुगार, दरोडेखोर आणि स्त्री यांच्याशी वायफळ गप्पा मारण्यात वेळ घालवू नका. यशाचे शिखर गाठायचे असेल तर मितभाषी असायला हवे. वायफळ गप्पांना फाटा म्हणजे यशाची किल्लीच म्हणावी.

दारिद्रय

दारिद्रयाने गांजलेल्या माणसाला कधीही गरीब म्हणू नये. भविष्यात तो कधीही अमाप संपत्तीचा धनी होऊ शकतो. त्याचं नशिब उजळलं तर तो कितीही पैसे कमावू शकतो.

पण अशिक्षित माणूस नेहमीच गरीब आणि दरिद्री असतो. अशिक्षित आणि अज्ञानी माणसाला कुणीही विचारत नाही आणि त्याच्याकडे दुर्लक्ष करतात.

प्रत्येकाचा स्वभाव

कवीच्या कल्पनाशक्तीला काही मर्यादा असते का? स्त्रीला कोणतेही काम अशक्य आहे का? दारुड्याच्या बडबडीला काही अर्थ असतो का? कावळा खाणार नाही असा कोणता पदार्थ असतो का?

माणूसही त्याच्या स्वभावानुसारच जगतो. आणि त्याच्या स्वभावानुसारच तो आपली कर्मे करतो.

शत्रू

कंजूष माणूस हा भिकाऱ्याचा शत्रू असतो. भिकारी माणूस श्रीमंत माणसाचा सहवास सहन करु शकतो, पण कंजूष माणसाचा सहवास क्षणभरही सहन करु शकत नाही.

जो इच्छा पूर्ण करीत नाही तो त्याचा शत्रू.

मूर्ख माणसाला उपदेश देणारा नेहमीच शत्रू वाटतो. व्यभिचारी स्त्रीला आपला पती नेहमीच शत्रू वाटतो. चंद्र हा नेहमीच चोराला आपला शत्रू वाटतो.

प्राणी कुणाला म्हणावे

जो माणूस शिकलेलाही नसतो आणि कामही करीत नाही, जो दान करीत नाही, ज्याचा स्वभाव नम्र नसतो, जो आपले कर्तव्य य पालन करीत नाही, जबाबदारी टाळतो, असा माणूस धरतीला भारच समजावा.

अरण्यातील रुंदन

दिलेला सल्ला जो गांभिर्याने ऐकत नाही अशा माणसाला सल्ला देणं मूर्खपणाचे आहे. अशी माणसं मलयगिरी पर्वतावर राहणाऱ्या सापासारखी असतात. मलयगिरी पर्वतावरच्या चंदनाच्या झाडांचा सुगंध त्याला त्या झाडांच्या सहवासात राहूनही येत नाही. सल्ला देऊनही जो तो उपयोगात आणत नाही, म्हणून असा प्रयत्न कधीच करु नये. ते अरण्यातील रुंदनासारखे असते. मूर्खाला दिलेला सल्ला नेहमी वाया जातो. कारण तो त्याचा उपयोगच करीत नाही.

ग्रहण करण्याचा गुण

धार्मिक ग्रंथांचा अभ्यास करताना तो गांभिर्याने आणि लक्ष देऊन केला तरच त्यातला अर्थ समजून घेता येतो. आंधळ्यासमोर आरसा धरला तर त्याला त्याचे प्रतिबिंब दिसेल काय? जो गंभीर, नम्र आणि ग्रहण करण्यास तयार आहे त्यालाच ज्ञान मिळते. ज्याच्यामध्ये हे गुण नाहीत त्याला ज्ञान कधीच मिळू शकणार नाही. तो पोपटपंची मात्र करु शकतो.

सुधारण्याच्या पलिकडे गेलेला

सुधारण्याच्या पलिकडे गेलेल्या माणसाला त्याची स्वत:ची इच्छा असल्याशिवाय संत होता येत नाही. जो कधीच मुक्त होऊ शकत नाही त्याला मुक्त कसे करता येईल? गुदद्वार कितीही स्वच्छ केले तरी ते स्वच्छ होऊ शकते का?

शत्रूत्व

आपल्यापेक्षा सामर्थ्यशाली आणि प्रतिष्ठित व्यक्तींशी शत्रूत्व कधीही करु नये. कोणत्याही परीस्थितीत ब्राह्मणाचा अपमान करु नये. त्याने शाप दिला तर संपूर्ण कुळाचा नाश होतो.

आपल्यापेक्षा कनिष्ठ माणसाशीसुध्दा शत्रूत्व करु नये. त्याच्यावर वर्चस्व मिळवता येतं, पण त्याने प्रतिष्ठा आणि मान कमी होतो.

आश्रित

कुणाच्या दयेवर आश्रित म्हणून राहणं हा फार दु:खदायक अनुभव असतो. त्यापेक्षा वाघ, सिंह, साप आणि हिंस्रपशूंच्या सहवासात जंगलात राहीलेलं बरं. शहाण्या माणसाने नातेवाइकांच्या दयेवर कधीही राहू नये. आश्रित म्हणून सोन्याच्या ताटात जेवण्यापेक्षा स्वतंत्र राहून केळीच्या पानावर जेवणे जास्त समाधान देतं.

ब्राह्मण

ब्राह्मण हा वृक्षासारखा असतो. वृक्षाच्या मुळांना सर्वांत जास्त महत्त्व असते. त्याप्रमाणे ब्राह्मणाचे मूळ म्हणजे संध्या. शारदा हे त्याचे खोड. पण त्याची पुण्यकर्मे म्हणजे झाडाचा पानसंभार. तोच त्याच्या मूळांचे रक्षण करतो. म्हणूनच त्याला संध्या करता येते. मूळं नष्ट झाली तर त्याचा दयाळूपणा नष्ट होतो. आणि त्याची पुण्य कर्मे नष्ट होतात. तो वृक्ष उजाड होतो.

आयुष्य हा एक प्रवास

पक्षी रात्र झाली की झाडांचा आसरा घेतात आणि सकाळ झाली की निळयाभोर आकाशात उडून जातात. आपले आयुष्य सुध्दा असाच क्षणापुरता आसरा समजावे. आपण अनेकांना भेटतो, नाती निर्माण करतो. पण मरण जवळ आले की सगळे सोडून जावे लागते.

सावधपणा आणि सामर्थ्य

सावधपणा नसेल तर सामर्थ्याला काही अर्थ नाही. सावधपणा नसेल तर दुर्बळ शत्रूसुध्दा तुमच्यावर मात करु शकतो. सशानं सावधपणा दाखवून सिंहाला विहीरीत कशी उडी मारायला लावली ही कहाणी तुम्हाला माहीत असेलच. प्रत्येकाने आपल्याजवळ प्रभावी शस्त्र बाळगायलाच हवे. पण सावधपणा नसेल तर शस्त्र कितीही प्रभावी असले तरी त्याचा काही उपयोग होत नाही. निशस्त्र माणसाच्या पावित्र्यापुढे सशस्त्र माणसाचे सुध्दा काही चालत नाही.

मर्यादा ओलांडू नये

माणसाने आपली मर्यादा कधीही ओलांडू नये. असे केल्याने तो दुसऱ्यांना तर फसवतोच शिवाय स्वत:लाही फसवतो. राजाने जर संयम सोडला तर ते संकटाला आमंत्रण दिल्यासारखेच असते. म्हणून प्रत्येकाने आपली मर्यादा कधीच सोडू नये.

शक्ती :

अवाढव्य आणि सामर्थ्यशाली हत्तीला काबूत ठेवायला एक अंकुश पुरेसा असतो.

एक लहानशा पणतीची लहानशी ज्योत अंधार नाहीसा करायला पुरेशी असते.

कितीही मोठे पर्वत असले तरी इंद्राचे वज्र म्हणजे वीज त्यांचा चक्काचूर करण्यास पुरेसे असते.

अकुशासारखे लोखंडाचे लहानसे शस्त्र सामर्थ्यशाली हत्तीला कसे ताब्यात ठेवते?

चोहीकडे पसरलेल्या अमर्याद अंधाराला इवलीशी ज्योत कशी नाहीशी करते? वीज म्हणजे इंद्राचे वज्र महाकाय पर्वताचा चक्काचूर कसा करते? म्हणजे शक्तीमान कोण आहे? याचा विचार करा.

वादादित सत्य

मांसाहार करणारा माणून कोमल स्वभावाचा असू शकतो का?

दुष्ट माणसाला कधी दया येते का?

गिधाडाच्या घरट्यात कधी मांसाचे तुकडे सापडतात का?

ते अशक्य आहे.

तसेच ज्याला घरातल्या कामापासून फुरसत मिळत नाही तो आपले शिक्षण कधीच पूर्ण करु शकत नाही. त्याला पूर्णपुरुष कधीच म्हणता येणार नाही.

दुष्टपणा

काहीजणांच्या अंगात दुष्टपणा हाडामासात मुरलेला असतो.

सापाला कितीही दूध पाजले तरी त्याच्या दंशातले विष तयार होणे बंद होणार नाही. कडूनिंबाच्या झाडाच्या मूळाशी उसाचा रस रोज घातला तरी झाडाची पाने गोड होणार नाहीत. ती कडूच राहतील.

कोल्ह्याला द्राक्षे आंबट

एखाद्याला हवी असलेली गोष्ट मिळाली नाही, किंवा त्या गोष्टीची किंमत कळाली नाही तर ती गोष्ट तो लगेच वाईट आहे म्हणून सोडून देतो.

माणसाचा स्वभाव त्या कोल्ह्यासारखा आहे. खूप उड्या मारुन आणि खूप प्रयत्न करुनही त्याला वेलीवरची द्राक्षे खाता आली नाहीत म्हणून द्राक्षे आंबट आहेत असे ठरवून तो निघून गेला.

गुणवान माणसे

गुणवान माणसे कधीही खोट्या मनाची नसतात. म्हणूनच अशा माणसांच्या प्रसिध्दीला काळाचे बंधन नसते. भगवान श्रीकृष्ण आणि राजा विक्रमादित्य हे त्यांच्या उदारपणासाठी प्रसिध्द होते. त्यांच्याजवळ जे होते ते त्यांनी उदारहस्ते दुसऱ्यांना दिले. त्यांच्या उदारतेमुळेच ते सर्वाना प्रिय आहेत.

मधमाशांकडे बघा. आपण गोळा केलेला मध कुणीतरी काढून नेणार याची त्यांना कल्पना असते. तरीसुध्दा ते अतिशय मेहनतीनं एकेक फुलामधला मकरंद गोळा करीत असतात. या चांगुल पणासाठीच मधमाशा प्रसिध्द आहेत.

प्रसिध्दी मिळवायची असेल तर तेवढयाच तोलामोलाचे कार्य करावे लागते. उदात्त वागणूक असल्याशिवाय माणूस लोकप्रिय होत नाही. अंगात गुणवत्ता असल्याशिवाय प्रसिध्दी मिळत नाही.

शूद्र कुणाला म्हणावे

तेलतूप, फुले, मध, दारु, मांस यांची विक्री आपल्या उदरनिर्वाहासाठी करणाऱ्या माणसाला शूद्र म्हणावे.

बदमाष कुणाला म्हणावे

बदमाष माणसाला इतरांचा नेहमीच हेवा वाटतो. दुसऱ्यांच्या इच्छा ते पूर्ण होऊ देत नाहीत, त्यात अडथळा आणतात. तलाव गलिच्छ करतात. बाग घाण करतात, मंदीर अपवित्र करतात. आपल्या मालकाच्या घरीच संपत्तीची चोरी करतात. आणि व्यभिचार करतात. अशी माणसं बदमाष असतात.

माणसाच्या कृतीनुसार त्याचा स्वभाव कळतो.

बदमाष आणि मंजर यांचा स्वभाव सारखाच असतो.

सहवासाचा परिणाम

संतांच्या सहवासात राहील्याने कोणत्याही माणसामध्ये चांगले गुण निर्माण होतात. पण जन्मजात दुष्ट माणसावर संतांच्या सहवासाचा काहीही परिणाम होत नाही. फुल मातीतूनच उमलत असले तरी फुलाला मातीचा गंध कधीच येत नाही. जन्मजात पवित्र असलेला माणूस जन्मभर पवित्रच राहतो. कोणत्याही विपरीत परिस्थितीत तो आपला चांगुलपणा सोडत नाही.

संतजन दुष्टांची मने पवित्र करीत असली तरी दुष्टांमुळे त्यांची मनं कधीच मलीन होत नाहीत.

## प्रत्येकाचा आनंद

कोणताही माणूस दुसऱ्यासारखा नसतो. त्याप्रमाणे प्रत्येकाचा आनंदही दुसऱ्यासारखा नसतो.

ब्राह्मणाला जेवणाचे आमंत्रण दिले तर आनंद होतो. शीलवान आणि संस्कारीत स्त्री पतीच्या सुखातच आपले सुख मानते. राजाने मंत्र्याच्या कार्याची स्तुती केली की त्याला आनंद होतो. व्यभिचारी माणसाला संभोगसुखातच आनंद मिळतो. बदमाष माणसाला दुसऱ्यांना फसवण्यातच आनंद होतो. दारात गिऱ्हाइक दिसले तर वेश्येला आनंद होतो.

प्रत्येकाचा आनंद वेगळा असतो.

## खरा ब्राह्मण कोणाला म्हणावे

परस्त्रीचा जो मातेसमान आदर करतो, ज्याला इतरांच्या संपत्तीविषयी असूया वाटत नाही, आणि जो भिकारी आणि राजा या दोघांचाही सारखाच आदर करतो तो खरा ब्राह्मण.

## कुणापासून काय शिकावे

सौजन्यशील वागणूक राजपुत्राकडून शिकावी. विनयशीलता हा गुण संतांकडून शिकावा. लबाडी कशी करावी हे जुगाऱ्याकडून शिकावे.

कधीकधी शहाण्यामाणसापेक्षा अज्ञानी माणसाचा सल्ला उपयोगी पडतो.

## अन्न

शहाण्या माणसाला अन्नाची हाव नसते. तो जगण्यासाठी खातो. काहीजण खाण्यासाठी जगतात. अन्नाचे इतके महत्त्व कशासाठी? कुत्रासुध्दा आपले पोट भरण्यासाठी काहीना काहीतरी करतोच.

## वय

अंगातले गुण वयोमानानुसार कमी होतात का? अर्थातच नाही. फळ पिकलं की ते गोड होतं. तसंच वय वाढलं की माणसाची बुध्दि आणि मन जास्त परिपक्व होत जातं.

## वैराग्य

सदाचरण करणाऱ्या संतांना पैशाचा, संपत्तीचा मोह नसतो. त्यांना कुणी पैसे अर्पण केले तरी ऐहिक सुखाची आशाच नसल्यामुळे ते पैशाला हातसुध्दा न लावता निघून जातात.

सुंदर आणि मोहक स्त्रीसुध्दा अशा सज्जनाला आपल्या कामुक चाळयांनी आपल्या जाळयात ओढू शकत नाही. कारण त्याला शरीराचा मोह नसतो.

अध्मात्मिक उन्नतीसाठी अशी माणसं जगाचा त्याग करतात. मग ते कितीही अडथळे, संकटे आली तरी आपले तत्त्व सदाचार सोडत नाहीत.

वैराग्य प्राप्त झाल्यामुळेच माणूस पुन्हा कधी मोहात पडत नाही. आत्मसंयम असलेल्या माणसाची इच्छाशक्ती पोलादासारखी असते. असा माणूस जग जिंकू शकतो.

## जसा राजा तशी प्रजा

राजा न्यायप्रिय असेल तर त्याची प्रजासुध्दा त्याचाच मार्ग अनुसरेल. पण राजा भ्रष्टाचारी असेल तर त्याची प्रजासुध्दा भ्रष्टाचारी असते. जसा राजा तशी प्रजा ही म्हण प्रसिध्द आहे.

## सत्यप्रियता

दुष्ट माणसे मेल्यानंतर फार काळ लक्षात रहात नाहीत. लगेच त्यांचे विस्मरण होते. परंतु सत्यप्रिय आणि सदाचारी माणूस आपला आदर्श जगासमोर ठेवून हे जग सोडून गेला तरी प्रत्येकाच्या हृदयात तो जीवंतच राहतो. इतिहासामध्ये असे पुष्कळ दाखले आहेत.

## काय उपयोग?

भाकड गायीचा कुणाला काही उपयोग होतो का? तसेच माणसाजवळ प्रामाणिकपणा नसेल किंवा समृध्दी नसेल तर अशा माणसाला कर्तव्याची जाणीव नसते आणि तो जगाच्या बंधनातून मुक्तही होऊ शकत नाही. थोडक्यात तो कुणाच्याच कामाचा रहात नाही.

असूया

अपयश हे असूया किंवा इर्षेचे मूळ कारण आहे. इतरांचं यश बघून त्याचं मन इर्षेने जळतं. अशा माणसाची प्रतिष्ठा आणि आत्मसन्मान दोन्ही नष्ट होतो. तो आपल्याच नजरेतून उतरतो.

अस्सल रत्ने

मूर्ख माणूस आपल्याजवळच्या रत्नांनांच मौल्यवान समजत असतो. पण त्यांना काहीही किंमत नसते. खऱ्या मौल्यवान गोष्टी कोणत्या असतील तर त्या आहेत अन्न, पाणी आणि मधुरवाणी. माणूस रत्नांशिवाय जगू शकतो, पण माणूस अन्न पाण्याशिवाय कधी जगू शकेल का?

शरीर पुन्हा मिळत नाही

घर सोडून गेलेली पत्नी परत येऊ शकते. गेलेली संपत्ती पुन्हा मिळवता येते. पण गेलेले शरीर पुन्हा परत मिळवता येत नाही.

ऐक्य

एकता किंवा ऐक्य ही फार सामर्थ्यशाली गोष्ट आहे. इतस्तत: विखुरलेल्या फांद्या हत्ती सहज पायानं चिरडू शकतो. पण याच फांद्यांची मोळी केली तर कितीही सामर्थ्यवान हत्ती असला तरी त्याला ती मोडता येत नाही.

रहस्य

तुमचं रहस्य एखाद्या दुष्ट माणसाला सांगितलं तर ते लगेच सगळीकडे पसरतं. मोठ्या माणसाशी केलेली अल्पशी चर्चासुध्दा मानव कल्याणासाठीच्या प्रदिर्घ संवादाचे स्वरुप घेऊ शकते. ज्ञानी माणूस लायक शिष्यालाच आपली विद्या आणि ज्ञान देतो. तो आपली ज्ञानाची संपत्ती आपल्या शिष्याला देऊन टाकतो. लक्षात ठेवा, पाण्यात पडलेला तेलाचा थेंब चटकन पाण्याच्या पृष्ठभागावर पसरत जातो.

चकित होण्याचे कारण काय?

इतरांचें गुण बघून चकित होण्याचे कारण काय? जगामध्ये उदार अंत:करणाची, सौजन्यशील, श्रीमंत, चतुर आणि ज्ञानी माणसं पुष्कळ असतात. जगात अनुकरणीय माणसांचा तुटवडा नाही. पण असे गुण आपणही प्राप्त करु शकतो हेही विसरुन चालणार नाही.

प्रेमाची शक्ती

प्रेम अंतर कमी करते. आणि कितीही रुंद दरी मिटवते. तुमच्या जोडीदारावर तुमचं प्रेम नसेल आणि तुमच्या हृदयात त्याला जागा नसेल तर तो तुमच्या कितीही जवळ असला तरी त्याला काही अर्थ नाही. मनानं तो तुमच्यापासून लाखो मैल दूर असेल.

लबाड माणसापासून सावध रहा

लबाड माणूस तोंडानं राम राम म्हणत असतो आणि काखेत सुरी लपवत असतो. संधी मिळताच तो सुरा काढून पाठीत खुपसतो. शिकारी गरीब बिचाऱ्या हरणाला जाळयात ओढण्यासाठी सुंदर गाणे गातो त्याप्रमाणे आपला स्वार्थी हेतू लपवण्यासाठी तो गोड गोड बोलतो. तो बकरीचे कातडे पांघरलेला कोल्हा असतो. सौजन्याचे ढोंग करणारा माणूस कावेबाज असतो.

जशास तसे

कावेबाज माणसाशी कावेबाजपणेच वागावे. हिरा हिऱ्यानेच कापता येतो. काटा काटयानेच काढता येतो. हे सत्य प्रत्येकाने लक्षात ठेवावे.

बदनामीला कारण

स्त्री, गुरु आणि राजा यांच्याशी फार जवळीक साधताना दोनवेळा विचार करावा. त्यांना दोन हात दूरच ठेवावे. ते तुमच्या बदनामीचे कारण केव्हा होतील सांगता येत नाही

सुज्ञ माणूस

सूज्ञ माणसाचं बोलणं वेळ-काळ पाहून त्याला सुसंगत असं असतं. तो आपल्यासारख्यांशी मैत्री करतो आणि गोड बोलून इतरांचा राग काबूत आणतो. त्याला धार्मिक ग्रंथ तोंडपाठ असतात. त्याच्यामध्ये कोणतेही दुर्गुण नसतात.

प्रत्येकाचा दृष्टिकोन

प्रत्येकाचा दृष्टिकोन वेगळा असतो. वैराग्य प्राप्त झालेल्या माणसाला शरीर हे नाशवंत आहे असं दिसतं. दुराचारी माणसाला शरीर हे भोगण्याचे साधन वाटते.

प्रत्येकाच्या विचाराप्रमाणे त्याचे कर्म असते.

काटकसरी असावे

माणूस जेंव्हा गरीब आणि विपन्नावस्थेत असेल तर त्याचे नातेवाईक आणि मित्र त्याला सोडून जातात. पण तोच श्रीमंत झाल्यावर तेच मित्र आणि तेच नातेवाईक त्याच्या

भोवती गोळा होतात. पैशामुळे माणसाला मान मिळतो. म्हणून नेहमी माणसाने हात राखून खर्च करावा. काटकसरीने वागून पैसा शिल्लक ठेवावा.

यश

परिस्थिती बघून जो वागतो त्यावरच त्याचे यश अवलंबून असते. कर्तृत्ववान माणूस क्षुल्लक गोष्ट सुध्दा महान करुन दाखवतो. पण वाईट माणूस चांगलं काम करायला गेला तर त्याचं हसू होतं.

अमृत हे संजीवन देतं. पण तेच अमृत अकार्यक्षम माणसाने दिले तर त्याच अमृताचे विष बनून मृत्यू येऊ शकतो. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे कैलाशपती शंकराने विष प्राशन केल्याने त्याला जास्त शक्ती प्राप्त झाली.

बिनशर्त प्रेम

खरी मैत्री बिनशर्त प्रेमावर आणि स्नेहबंधनावर अवलंबून असते. संकटकाळी गरज पडली तर मित्रासाठी प्राणाचा त्यागही करायला तयार होतो. पवित्र हृदयाचा माणूस सूज्ञपणा आणि न्यायप्रियता यांचा मूर्तीमंत पुतळा असतो. उध्दटपणा आणि पोकळ गर्व याचा तो धनी कधीच नसतो.

सत्य लपून रहात नाही

काही रत्ने काचेच्या मण्यांप्रमाणेच दिसतात. पण सत्य कधीच लपून रहात नाही. ते कधीतरी प्रकट होतेच.

कागदाची फुले खऱ्या फुलांपेक्षा कितीही सुंदर दिसत असली तरी त्याला खऱ्या फुलाप्रमाणे सुगंध कधीच येणार नाही.

निर्दयी गुन्हेगार कोणाला म्हणावे?

दुरुन आलेल्या पांथस्थाला जो रात्रीपुरता सुध्दा आसरा देत नाही, जो पाहुण्यांच्या आधी जेवायला बसतो, आणि जो दुसऱ्याची संपत्ती हडप करतो त्याला निर्दयी गुन्हेगार म्हणावे.

नरकात कोण जातो?

राग, संताप, कठोर बोल आणि विद्वानाशी भांडण करणारी माणसे नरकात जातात.

पराधीनता

दुसऱ्याच्या आश्रयाने राहिलेला माणूस नेहमीच पराधीन असतो. चंद्र सूर्यावर र अवलंबून असतो. दिवसा चंद्र उगवला तर सूर्यामुळे त्याचा प्रकाश पडत नाही. दुसऱ्याच्या आधाराने राहणारा माणूस कितीही मोठा असला तरी त्याचे जीण परावलंबीचे असते. म्हणून जो माणूस स्वत:च्या पायावर उभा असतो त्यालाच मोठा समजावे.

थोडक्यात समाधान मानावे

भुंगा जोपर्यंत कमळाच्या पानात असतो तोपर्यंत त्याला तिथं राहण्याचा आनंद मिळतो. परंतु दुसरीकडे गेल्यावर त्याला जे फुल मिळेल त्यात समाधान मानावे लागते. त्याचप्रमाणे उपाशी राहण्यापेक्षा थोडेसे खायला मिळाले तरी त्यात समाधान मानावे. काहीच नसण्यापेक्षा थोडेसे असणे चांगले. थोडक्यात समाधान मानावे.

योग्य वेळ

कोकीळ नेहमी वसंत ऋतू असेल तरच गातो. तो वेळ आणि स्थळ बघून मगच गोड गाणे गातो. पक्षी आणि प्राणी नेहमीच ऋतुमानाप्रमाणे वागतात. स्थळ आणि काळ त्यांच्यासाठी फार महत्त्वाचे असतात. वेळ आणि काळ बघून जो माणूस वागत किंवा बोलत नाही तो प्राण्यां-पक्ष्यांपेक्षाही खालच्या जातीतला समजावा. कवी आणि गायकाने समोरच्या श्रोत्यांची आवडनिवड बघून गावे. श्रोते रसिक नसतील तर कवीच्या कवितांची किंवा गायकांच्या गायनाची हेटाळणी होते.

एकाच माळेचे मणी

या जगात असा कोण आहे की जो पैसा मिळाल्यावर गर्विष्ठ होत नाही? सुंदर स्त्रीच्या कामुक हालचालींनी जो विचलीत होत नाही? काळाच्या दाढेतून कोण बचावला आहे? ज्याला कधी ना कधी व्देष करावासा वाटला नाही असा कोण आहे? मिष्टान्न आणि खाद्यपदार्थ बघून ज्याच्या तोंडाला पाणी सुटले नाही असा कोण आहे? खरे सांगायचे तर सगळे एकाच माळेचे मणी आहेत.

विनाशकाले विपरीत बुध्दी

संकट येणार असेल तर शहाण्या माणसाची बुध्दीसुध्दा भ्रष्ट होते असं म्हणतात.

सोन्याचा हरीण कधी कुणी बघितला आहे का? कुणीही नाही. तरीही तो सीतेने बघितला. रामाने त्याचा पाठलाग केला. कारण सीतेला रावण पळवून नेणार होता. म्हणून तिला अशी विपरीत बुध्दी सुचली. विनाशकाले विपरीत बुध्दी असे म्हणतात ती हीच.

ढोंगीपणा

मानसिक कमजोरी असणारा माणूसच साधू बैरागी होतो. दरिद्री माणूस ब्रह्मचारी राहतो. रोगांनी पिडलेला माणूस परमेश्वराची भक्ती करतो. वृध्द स्त्री पतीव्रता असल्याचं ढोंग करते. त्या त्या वयात ते ते न मिळाल्याने निराश झालेल्यांची ही ढोंगबाजी आहे.

मनाची शुध्दता

मन शुध्द असेल तर अशा माणसाला तीर्थयात्रेला जाण्याची गरज नसते. त्याचे पवित्र हृदय हेच तीर्थस्थळ असते.

गुणांचे कौतुक

गुणांचे कौतुक सर्वजण करतातच, पण स्वत:ची तारीफ स्वत:च करणाऱ्याचे जगात हसे होते. लायक माणसाच्या अंगी गुण असले तर ते शोभून दिसतात. अस्सल हिऱ्यामोत्याची सामान्य माणसाला काय किंमत? रत्न कोंदणात बसवले म्हणजेच ते शोभून दिसते. चांगल्या माणसाच्या अंगात असलेले गुण लपून रहात नाहीत.

माणसाची हाव

पैसा, आयुष्य, स्त्री आणि भोजन या गोष्टी कितीही मिळाल्या तरी माणसाचे समाधान होत नाही. माणसाची हाव कधी संपतच नाही.

सर्वात हलके

गवत वजनाला सर्वात हलके असते.

कापूस त्याहून हलका असतो.

याचक हा कापसाहूनही हलका समजावा.

असे असूनही वारा त्याला कापसासारखा उडवत नाही. कारण वाऱ्यालाही भीति वाटते की हा कदाचित आपल्यासमोरही हात पसरेल.

त्यापेक्षा मरण बरे

अपमान होण्यापेक्षा मरण बरे. मरणाच्या यातना काही क्षणापुरत्या असतात. पण अपमानाचे दु:ख जन्मभर डाचत राहते.

खरे सत्य

अन्नदानासारखे श्रेष्ठ दान नाही.

द्वादशीसारखी श्रेष्ठ तिथी नाही.

गायत्री मंत्रासारखा श्रेष्ठ मंत्र नाही.

आईसारखी श्रेष्ठ देवता नाही हेच खरे सत्य आहे.

एक गुणही मोठा असतो

केवड्याला काटे असतात. परंतु त्याच्या ठिकाणी असणारा सुगंध हाच सर्वांना आवडतो. माणसाच्या अंगात कितीही दोष असले आणि एकच गुण असला तरी तो लोकांना आवडतो.

हे योग्य नव्हे

गुरुच्या मार्गदर्शनाशिवाय अध्यात्माचा अभ्यास करणारा माणूस हा अनैतिक संबंधातून गर्भवती राहीलेल्या स्त्रीसारखा असतो.

निषिध्द समजावे

पाण्यात पडलेले आपलेच प्रतिबिंब पाहणे, न्हाव्याची घरी जाऊन केलेली हजामत, तसेच दगडावर उगाळलेले चंदन निषिध्द समजावे. त्या अशुभ आहेत.

कुणी बोलावल्याशिवाय त्याचे घरी जाणे, विचारपूस केल्याशिवाय सढळ हाताने दिलेले दान, दुसरे बोलत असताना मध्येच तोंड घालणे हे असभ्यपणाचे समजले जाते.

जे हवे ते मिळते

कुंडरु खाल्ल्याने बुध्दीभ्रष्ट होते. पण तीच अल्पप्रमाणात खाल्ली तर बुध्दी सतेज होते. ईश्वराने एकाच्या उलट दुसरी अशा परस्परविरोधी गोष्टी निर्माण केल्या आहेत. कुणाचा कसा उपयोग करावा हे ज्याचे त्याने ठरवावे. या भूतलावर सर्व काही आहे. ज्याला जशी आवड असेल तसे त्याने घ्यावे.

नशिबाचा खेळ

शंखाचा बाप म्हणजे समुद्र तो रत्नांना जन्म देतो. शंखाची आई लक्ष्मी असली तरी शंख भिकाऱ्याच्या हातात पडतो आणि भीक मागतच फिरतो. त्यात शंखाचा काय दोष? हा सर्व नशिबाचा खेळ आहे.

आत्मज्ञान

बांगड्या घालून हाताला शोभा येत नाही. दान दिल्याने हाताला शोभा येते.

चंदनाचे गंध अंगाला लावल्याने शरीर शुध्द होत नाही, स्नान केल्यानेच शरीर शुध्द होते. भोजनाने पोट भरल्याचे समाधान मिळते, पण खरे समाधान मान मिळाल्यानेच होते. मुक्ती मिळते ती आत्मज्ञान मिळवल्यानेच. आत्मज्ञान मिळत नाही तोपर्यंत माणसाचे आयुष्य दिशाहीन असते.

नियम पाळावे

झोपेत घोरणारी स्त्री आणि कपडे काढून झोपणारा पुरुष दोघांचे आयुष्य कमी होते. दिवसा स्त्रीसुख आणि रात्री जुगार खेळणे यामुळे माणूस अल्पायुषी होतो. आयुष्यात काही नितिनियम पाळावे लागतात. ते जर पाळले नाही तर आयुष्याचे नुकसान होते.

दिसण्यावर काही नसतं

हत्ती आणि मुंगी यांची तुलना कशी काय होऊ शकते? हत्ती आकारानं मोठा आणि मुंगी आकारानं लहान असली तरी दोन्ही गोष्टी जगामध्ये आढळतात. लहान किंवा मोठा या आकारावर काहीच अवलंबून नसतं. प्रत्येकाचे कार्य महत्त्वाचे असते. गणेशाला सोंड आहे. शंकाराला जटा आहेत. अष्टावक्राचे शरीर आठ ठिकाणी वाकडे आहे. तरीही जग त्यांची पूजा करतें. आकार व रुप पाहू नये. गुण बघावे. रुप व आकार हा वरवरचा देखावा आहे.

विद्वत्ता

गाय काहीही खाते परंतु दूध देते. दूधापासून काय करता येत नाही? अनेक पदार्थ तयार करता येतात. तसेच शहाणे लोक कसे का वागेनात त्यांचे ज्ञान अनुकरण्या योग्य असते. शहाण्या माणसामध्ये कोणते गुण असतात हे दुसरा शहाणा माणूसच ओळखू शकतो.

सवयीचे गुलाम

साप नेहमीच नागमोडी चालतो. कुत्र्याचं शेपूट नेहमी वाकडेच असते. गाढवाला लाथा मारायची सवयच असते. मुंगीला कितीही हाकला ती पुन्हा त्याच ठिकाणी परत येते. माशीला कितीही हाकला ती तिथेच येऊन बसते. त्याचप्रमाणे माणूसही सवयीचा गुलाम असतो.

वरुन एक आतून एक

हत्तीचे खायचे दात वेगळे असतात आणि दाखवायचे दात वेगळे असतात. जगात आतून बाहेरुन सारखाच असणारा पुरुष दुर्मिळच असतो. माणसालाही दोन चेहरे असतात. तो वरुन सज्जन असतो आणि आतून दुर्जन असतो.

## मोठ्यांचे नेहमी गुणच बघावेत

भगवान श्रीकृष्ण गोपाळ असूनही रासक्रिडा करीत असे. अजुर्न स्त्री बनला होता. शंतनु कोळ्याच्या मुलीवर भाळला होता. म्हणून आपणही तसेच करावे काय? नाही. महापुरुषाचे नेहमी गुणच बघावे. त्यांचे वागणे बघू नये. प्रत्येकामध्ये काही अवगुण असतातच.

## दुरुन नमस्कार

शहाण्या माणसाने कुमारी कन्या, वेडा, महारोगी, हलक्या जातीचा माणूस आणि कानफाट्या गोसावी यांच्यापासून दूरच रहावे. यांची संगती म्हणजे संकटाला आमंत्रण. म्हणून शहाणा माणूस अशांना दुरुनच नमस्कार करतो.

## शुभ शकुन

पापी माणसाला देवळात बघणे, सरणावर ठेवलेले प्रेत बघणे आणि मांडीवर झोपलेले लहान मूल बघणे हे अशुभ सूचक नसते. हे शुभ शकुनच समजावे. हे पाहिल्याने ज्ञानात वाढ होते. अध्यात्म ज्ञान वाढते.

## कर्म व भाग्य

नशिबात नसेल तर काय होणार? आंबा नशिबात नसेल तर आंब्याच्या झाडाखाली तोंड उघडे ठेवून झोपले तरी आंबा तोंडात पडणार नाही. त्यासाठी कष्ट घ्यावे लागतात. भाग्यात असलेले मिळायलासुध्दा आधी कष्ट करावे लागतात तरच मिळते. नुसते नशिबावर अवलंबून राहू नये. कर्मावर विश्वास ठेवावा.

## विरुध्द स्वभाव

तेल आणि तूप पाण्यात कधीच मिसळले जात नाही. तसेच परस्परविरोधी मते असलेल्या व्यक्ती कितीही भांडल्या तरी त्यांचे कधीही एकमत होऊ शकणार नाही.

## काळ

काळाची गती कुणालाही थांबवता येत नाही. काळाची गती ज्याने ओळखली त्याचे जीवन सफल झाले असे समजावे. जो काळाबरोबर चालतो त्यालाच त्याची किंमत कळते.

## फसवे सुख

मदिरा व मदिराक्षीच्या सहवासाने सुख मिळते पण त्याचे परिणाम काय होतात

हे माहीत आहे काय? गटारातला किडा होऊन मरशील. सुरा आणि सुंदरी तुझी शक्ती आणि धन नष्ट करण्यासाठी आली आहे. त्यांच्यापासून सावध रहा. नाहीतर नरकातच जावे लागेल.



चाणक्य हा प्राचीन काळातील सर्वोत्तम असा राजकारणी आणि धोरणी पुरुष होता यात वादच नाही. पण आजतागयत चाणक्याचे राजकारण आणि नैतिकता या विषयीची त्याची मते अंधारातच होती.

चाणक्याची बुध्दीमत्ता कालातीत आणि वादातीत होती. प्रत्येकाला नैतिकतेने वागण्याची आणि नैतिकता कायम ठेवण्याची कशी गरज आहे या विषयी या पुस्तकात भर दिला गेला आहे. चाणक्याचे विचार अतिशय दूरदर्शी आणि स्पष्ट आहेत. या पुस्तकात स्री, कुटुंब, जीवन, मानवी परस्परसंबंध आणि नाती, नैतिक आचरण तसेच अध्यात्म व तत्वज्ञान या विषयावरची चाणक्याची अचूक निरीक्षणे दिली आहेत. त्याची चकित करणारी भाकिते, दैनंदिन जीवनावरची अर्थपूर्ण भाष्ये आणि कठोर तत्त्वे असे अनेक विषय या पुस्तकात असल्यामुळे हे सखोल विचारांचे आणि विवेकाचे भांडारच आहे.

Elevate Your Life. Transform Your World.

JAICO BOOKS

www.jaicobooks.com History/Self-Help

ISBN-13: 978-81-8495-370-1

J-858M

e Book AVAILABLE